■ छत्रपती संभाजीनगर वर्ष : ३रे • अंक : ०३ • रविवार, दि. ३० नोव्हेंबर २०२५ • पाने : ८ किंमत : ३ रु. RNI.No.MAHMAR/2002/7000 www.gavakari.in gavkarinews.com

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी


## १९ देशातील निर्वासितांना अमेरिकेत नो एन्ट्री

**वॉशिंग्टन :** गुरुवारी वॉशिंग्टन डीसीमध्ये दोन नॅशनल गार्ड्समनच्या मृत्यूनंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेला बळकटी देण्यासाठी तिसऱ्या जगातील देशामधून येणाऱ्या निर्वासितांना कायमची बंदी घालण्याची घोषणा केली आहे. तिसऱ्या जगातील देश या शब्दाचा कायदेशीर अर्थ नाही, परंतु सामान्यतः आफ्रिका, आशिया, लॅटिन अमेरिका आणि मध्य पूर्वेतील कमी उत्पन्न असलेल्या किंवा कमी मध्यम उत्पन्न असलेल्या श्रेणींमध्ये येणाऱ्या देशांना संदर्भित करण्यासाठी वापरला जातो. ट्रम्प यांनी गुरुवारी वॉशिंग्टन डीसीमध्ये दोन नॅशनल गार्ड्समनच्या मृत्यूनंतर ही घोषणा केली. त्यांनी या हल्ल्याचा संबंध निर्वासितांशी जोडला.

## संक्षिप्त बातम्या

### व्लादिमीर पुतिन दोन दिवसीय भारत दौऱ्यावर

विविध क्षेत्रांत द्विपक्षीय संबंध दृढ होणार



**नवी दिल्ली :** रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन हे गुरुवार, ४ डिसेंबरपासून दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात भारत-रशिया यांच्या २३ व्या वार्षिक परिषदेत पुतिन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात चर्चा होऊन संरक्षणासह विविध क्षेत्रांत द्विपक्षीय संबंध आणखी दृढ करण्यावर भर देण्यात येणार आहे. यामुळे भारत-रशिया यांच्यातील विशेष द्विपक्षीय भागीदारी बळकट होणार आहे, असे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या पुतिन यांचे स्वागत करतील आणि त्यांच्या सन्मानार्थ स्नेहभोजन आयोजित करतील. द्विपक्षीय संबंधातील प्रगती, सामायिक हिताच्या प्रांतीय आणि जागतिक मुद्यांवर पुतिन आणि पंतप्रधान मोदी यांच्यात चर्चा होईल, असे परराष्ट्र मंत्रालयाने या निवेदनात नमूद केले आहे.
संरक्षण व सुरक्षा, व्यापार, नागरी अणुऊर्जा आदी क्षेत्रांबरोबरच उभयपक्षी महत्त्वाच्या मुद्द्यांवर पंतप्रधान मोदी आणि पुतिन यांच्यात चर्चा होण्याची अपेक्षा आहे. यावेळी विविध आंतरविभागीय आणि व्यावसायिक करार होण्याची शक्यता आहे. यावेळी रशिया-युक्रेन संघर्षाचा मुद्दाही चर्चेत येण्याची शक्यता आहे. ऑपरेशन सिंदूर मध्ये प्रभावी ठरलेल्या एस-४०० क्षेपणास्त्र प्रणालीची रशियाकडून अतिरिक्त खरेदीबाबतही यावेळी निर्णय होण्याचे संकेत आहेत. याआधी पुतिन हे २०२१ मध्ये भारतभेटीवर आले होते, तर पंतप्रधान मोदी यांनी गेल्या वर्षी रशियाचा दौरा केला होता.

### राजू शेट्टींसह ८० जणांची निर्दोष मुक्तता

**कोल्हापूर :** जिल्ह्यातील शिरोली येथे २०११ साली झालेल्या ऊस आंदोलनातून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांच्यासह ८० जणांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. कोल्हापूर सत्र न्यायालयात न्यायाधीश कश्यप यांच्या कोर्टात झालेल्या सुनावणीनंतर सर्वांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. १६ वर्षानंतर हा निकाल लागल्याने आंदोलनातील शेतकऱ्यांनी न्यायालयाच्या आवारातच एकमेकाला गळाभेट घेत आनंद व्यक्त केला. यावेळी बोलताना राजू शेट्टी म्हणाले की, शेतकरी आंदोलने करत असताना आंदोलन दडपण्यासाठी तत्कालीन राज्य सरकारने पोलिस प्रशासनास हाताशी धरून जाणीवपूर्वक हा गुन्हा दाखल केलेला होता. या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता झाल्याने चळवळीमध्ये लढण्यासाठी कार्यकर्त्यांना पुन्हा बारा हत्तीचे बळ आले आहे. शेतकरी हा न्याय हक्कासाठी व घामाच्या दामासाठी संघर्ष करत होता आणि तो यापुढेही लढतच राहणार असल्याची भावना राजू शेट्टी यांनी व्यक्त केली.

# ‘दितवाह’ चक्रीवादळ भारताच्या किनारपट्टीवर !

## श्रीलंकेत १२३ जणांचा बळी, ५४ विमानांची उड्डाणे रद्द ; राज्यात पावसाची शक्यता

**ऑनलाईने नेटवर्क -** श्रीलंकेत विध्वंस घडवल्यानंतर दितवाह चक्रीवादळ भारताच्या दिशेने वेगाने सरकत आहे. तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि पुद्दुचेरीच्या किनारी भागांत जोरदार वाऱ्यांसह मुसळधार पाऊस सुरू झाला आहे. तामिळनाडूमध्ये मुसळधार पावसामुळे चेन्नईतील ५४ विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. पुद्दुचेरी सेंट्रल युनिव्हर्सिटीने चक्रीवादळामुळे शनिवारी सुट्टी जाहीर करून सर्व परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. पुद्दुचेरी, कराईकल, माहे आणि यनममधील सर्व शाळा आणि महाविद्यालये सोमवारपर्यंत बंद ठेवण्यात येणार आहेत. याचा परिणाम महाराष्ट्रवरही होणार असून राज्यात पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

भारतीय हवामानशास्त्र विभागाने सांगितले की, दितवाह चक्रीवादळ ३० नोव्हेंबर रोजी तामिळनाडू-पुदुच्चेरीच्या किनाऱ्यावर धडकणार आहे. यामुळे राज्यभरात मुसळधार पाऊस पडेल. तामिळनाडू, आंध्र आणि पुदुच्चेरीमध्ये पूर येऊ शकतो. डोंगराळ भागात भूस्खलनाचा धोका आहे.

नागपट्टिनममध्ये शनिवारी मुसळधार पाऊस झाला, त्यामुळे शहराच्या अनेक भागांत पाणी साचले. नागोर वल्लियाम्मा परिसरात झोपड्यांमध्ये पाणी शिरले.कराईकलमध्ये ▸▸ पान २ वर



### भारताचे अनेक प्रवासी अडकले

श्रीलंकेत दितवाहमुळे आलेल्या पूर आणि भूस्खलनामुळे १२३ हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. १३० हून अधिक लोक बेपत्ता आहेत. चेन्नईची विमानांची उड्डाणे रद्द झाल्यामुळे कोलंबो विमानतळावर सुमारे ३०० भारतीय प्रवासी गेल्या तीन दिवसांपासून अडकले आहेत. हे सर्व दुबईहून श्रीलंकेमार्गे भारतात येणार होते.

### एनडीआरएफच्या तुकड्या मदतीला

दितवाह चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर, तामिळनाडूतील विलुप्पुरम, चेंगलपट्टू, तिरुवल्लूर, नागपट्टिनम, तिरुवरूर, तंजावर, पुदुकोट्टई आणि मयिलादुथुराई यांसह संवेदनशील किनारी जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एनडीआरएफ) १४ तुकड्याही तैनात करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रातील पुणे आणि गुजरातमधील वडोदरा येथील एनडीआरएफ तळावरून १० तुकड्या चेन्नईसाठी रवाना झाल्या आहेत. नागपट्टिनममध्ये चक्रीवादळाच्या प्रभावामुळे किनारी भागांमध्ये उंच लाटा उसळत आहेत. ४० ते ६० किमी प्रति तास वेगाने सोसाट्याचे वारेही वाहत आहेत.

# विनोद राधास्वामीचे ११ सहकाऱ्यांसह आत्मसमर्पण

## नक्षलवादी संघटनेचा होता प्रमुख

**गोंदिया /प्रतिनिधी**

देशातील नक्षलवाद संपवण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. अशातच आता गोंदियामध्ये २५ लाख रुपयांचे बक्षीस असलेला आणि सीपीआय (माओवादी) नक्षलवादी संघटनेचा प्रमुख नेता अनंत उर्फ विकास नागपुरे उर्फ विनोद राधास्वामीने ११ सहकाऱ्यांसह आत्मसमर्पण केले आहे.

विकास नागपुरेवर २५ लाख रुपयांचे बक्षीस होते. विकासच्या आत्मसमर्पणामुळे खैरलांजी हत्याकांड (२००६) आणि भीमा कोरेगाव हिंसाचार (२०१८ ) सारख्या प्रकरणांमधील नक्षलवाद्यांच्या सहभागाबाबतचे रहस्य उलगडू शकते.

अंदाजे ५० वर्षांचा असलेल्या विकासचा जन्म एका नक्षलवादी कुटुंबात झाला होते. त्याचे पालक नक्षलवादी होते. विकासचे शिक्षण मुंबईत झाले, त्यानंतर त्याने नक्षलवादी प्रेरित विद्यार्थी संघटनांमध्ये काम केले. त्याने विदर्भातील दलित-पीडित तरुणांना क्रांतिकारी भाषणांनी प्रभावित करून त्यांची भरती केली.



महाराष्ट्र-मध्य प्रदेश-छत्तीसगड (एमएमसी) विशेष क्षेत्रीय समितीचा प्रवक्ता विकासने २४ नोव्हेंबरला आत्मसमर्पणाची तयारी दर्शवत १५ फेब्रुवारीपर्यंत मुदत मागितली होती. मात्र आता त्याआधीच त्याने गोंदिया पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले आहे. आत्मसमर्पण केलेल्या इतर नक्षलवाद्यांमध्ये डीव्हीसीएम कमांडर नागसु गोलू वड्डे, रानो पोरेटी, संतु पोरेटी, संगीता पंधरे, प्रताप बंतूला, अनुजा कारा, पुजा मुडीयम, दिनेश सोट्टी, शीला मडावी, अर्जुन दोडी यांचा समावेश आहे. या सर्वांनी आपली हत्यारे जमा केली आहेत.

# आमदार सुरेश धस यांच्यापासून धोका

## ॲड. असीम सरोदेंचा खळबळजनक दावा

**पुणे :** येथील नावाजलेले वकील ॲड. असीम सरोदे यांनी आमदार सुरेश धस यांच्यापासून आपल्या जीवाला धोका असल्याचा दावा केला आहे. धस यांच्या समर्थकांनी ज्या खाडे नावाच्या व्यक्तीला मारहाण केली, त्या व्यक्तीच्या नातेवाईकांकडून आपल्याला ही माहिती मिळाल्याचंही त्यांनी सांगितले.

बुधवारी सायंकाळी ७ वाजता माझे पतीसोबत फोनवर बोलणे झाले होते, रात्री नऊ वाजेपर्यंत ते घरी येणार असं त्यांनी सांगितले होते. त्यानंतर, त्यांच्यावर हल्ला झाल्याचे मला समजल्याचे राम खाडे यांच्या पत्नी तुळसा खाडे यांनी सांगितले. आता, ॲड. असीम सरोदे यांनीही आमदार सुरेश धस यांच्यापासून आपल्या जीवाला धोका असल्याचे म्हटले. बीड जिल्ह्यात राम खाडे कार्यरत आहेत, गेल्या ५ वर्षांपासून माझे आणि त्यांचे संबंध आहेत. ज्यावेळेस देवस्थानच्या जमिनीच्या संदर्भातील भ्रष्टाचार त्यांनी कागदपत्रांच्या आधारे माझ्या लक्षात आणून दिला, तसेच वेगवेगळ्या ठिकाणी तक्रारी दिल्या होत्या. पोलिसांकडेही तशा तक्रारी दिल्या होत्या. राम खाडे यांच्या प्रयत्नांना यश येत नव्हते. त्यानंतर, ते माझ्याकडे आले असता, तब्बल १००० कोटींचा आर्थिक गैरव्यवहार आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून झालेला आहे. देवस्थानच्या जमिनी त्यांनी स्वतः:च्या खासगी लोकांच्या नावाने त्यांनी करुन घेतल्या आहेत. त्यामध्ये, प्रशासनातील अधिकाऱ्यांनी त्यांना मदत केल्याचं दिसून येत आहे. यासंदर्भात आम्ही मुंबईतील ईडीच्या कार्यालयात तक्रार दाखल केली. मात्र, ईडीनेही भाजप आमदार असल्याने कदाचित त्यांच्यावर कुठलीही कारवाई केली नाही. पोलिसांनीही दखल घेतली नाही. अखेर संभाजीनगरच्या उच्च न्यायालयात खाडे यांनी धाव घेतली. त्यानंतर, उच्च न्यायालयाच्या आदेशाने गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, कुणालाही पोलिसांकडून अटक करण्यात आली नाही.



### खाडेंसारख्या व्यक्तीचं संरक्षण झालं पाहिजे : सरोदे

दरम्यान, काही महिन्यांपूर्वी राम खाडे यांच्या शेतातील शेडवर हल्ला करण्यात आला. त्यांच्या नातेवाईकांवर हल्ला करण्यात आला. राम खाडे यांनी विविध विभागात अर्ज करुन, नेत्यांना भेटून स्वत: साठी संरक्षण मिळवलं. मात्र, ते संरक्षण काढून घेण्यात आलं. विशेष म्हणजे राम खाडे यांच्यावर निर्घृणपणे हल्ला करण्यात आल्याची माहिती मिळाली. याशिवाय, माझ्या देखील जीवाला धोका असल्याचं असीम सरोदे यांनी सांगितलं. राम खाडेंसारख्या व्यक्तीचं संरक्षण झालं पाहिजे, अशी भावनाही सरोदे यांनी व्यक्त केली.

# बेपत्ता दाम्पत्यांचा विहिरीत आढळला मृतदेह

## घातपात ; नोतेवाईकांकडून संशय व्यक्त

**बुलढाणा/प्रतिनिधी**

जळगाव येथे लग्न सोहळ्यासाठी तेलंगणा राज्यातील सीतापूरम येथून कारने निघालेलं दाम्पत्य बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव ते मलकापूर दरम्यान गायब झाल्याने नातेवाईक व मित्र परिवारामध्ये खळबळ उडाली होती. जिल्ह्यीतल वडनेर भोलजी परिसरात हे दाम्पत्य रहस्यमयरित्या बेपत्ता झाल्यानंतर त्यांच्यासाठी शोधमोहिम सुरू करण्यात आली.

याबाबत दाम्पत्याच्या नातेवाईकांनी नांदुरा पोलिसात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी शोध घेतला असता येथील एका विहिरीत कार आढळून आली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत कार विहिरातून बाहेर काढली आहे.





दरम्यान, ही कार गायब झालेल्या पाटील दाम्पत्याचीच असल्याचं आता समोर आलं असून दोघांचेही मृतदेह कारमध्ये आढळून आले आहेत.

जळगाव जिल्ह्यातील पद्मसिंह दामू पाटील हे तेलंगणा राज्यातील सीतापुरम येथील एका खाजगी सिमेंट कंपनीमध्ये कार्यरत आहेत. ते व त्यांची पत्नी नम्रता हे त्यांच्या स्वतःच्या कार क्रमांक एम एच १३ बी एन ८५८३ ने जळगाव खान्देश जिल्ह्यातील पाचोरा येथे लग्न सोहळ्याला जाण्यासाठी निघाले होते. त्यांचं शेवटचं मोबाईल लोकेशन हे बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव ते मलकापूर दरम्यान महामार्गावर असलेल्या वडनेर गावाजवळ आढळून आलं आहे. मात्र, त्यानंतर हे दाम्पत्य रहस्यमयरित्या बेपत्ता झाल्याची तक्रार दांपत्याच्या नातेवाईकांनी नांदुरा पोलिसात दाखल केली. त्यानुसार, पोलिसांचे पथक या दांपत्यांच्या शोधासाठी रवाना झाले असतानाच परिसरातील एका विहिरीत कार आढळून आली आहे. अचानक बेपत्ता झालेल्या दांपत्याच्या घटनेमागे घातपाताचा संशय ही व्यक्त होत आहे.

### हा अपघात आहे की घातपात ?

वडनेर भोलजी नजीक राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ च्या बाजूला एका विहिरीत पांढऱ्या रंगाची एक कार आढळून आली असून ही कार पाटील दांपत्याची असण्याची शक्यता वर्तवली जात होती, ती खरी ठरली.पोलिसांनी गेल्या २४ तासापासून पोलिसांनी युद्ध पातळीवर शोध मोहीम राबवली होती. पोलिसांनी क्रेनच्या सहाय्याने ती कार बाहेर काढली असता आतमध्ये दोघांचेही मृतदेह आढळल्याने सर्वांना धक्का बसला.

# एकाच कुटुंबातील ६ जणांना तिकिटं

## शिंदेसेनेतील कार्यकर्त्यांत रोष, आता एका घरातील दोघांनाच उमेदवारी

**ठाणे :** उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे प्रमुख नेते असलेल्या एकनाथ शिंदे यांच्या बालेकिल्ल्यात सध्या शह-काटशहाचं राजकारण सुरु आहे. याच भागातील एकाच कुटुंबातील अनेकांना तिकिटं देण्याचा धडाका शिंदेसेनेनं लावला आहे. त्यानंतर कार्यकर्त्यांमधून आलेली प्रतिक्रिया पाहता पक्षाला उपरती झाली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या मानल्या जातात. मात्र अनेक ठिकाणी उलटं चित्र दिसू लागलं आहे. बदलापूरमधील शिंदेसेनेचे नेते वामन म्हात्रेंच्या कुटुंबातील सहा सदस्यांना उमेदवारी मिळाल्यानं शिंदेसेनेवर टिकेची झोड उठली. घराणेशाहीचे आरोप होऊ लागले. आता कल्याण-डोंबिवलीसह त्याची अन्य ठिकाणी पुनरावृत्ती होऊ नये, याची काळजी भाजप आणि शिंदेसेना घेणार आहे. त्यामुळे आता एकाच घरातील केवळ दोघांना उमेदवारी मिळू शकेल. भाजप, शिंदेसेनेच्या या निर्णयानं राजकीय घराण्यांची गोची होणार आहे.

वामन म्हात्रे यांच्या कुटुंबातील सहा जणांना शिंदेसेनेने उमेदवारी दिली. त्यानंतर अनेकांनी सोशल मीडियावर स्वत:सह पत्नी, मुलांचे फोटो टाकून स्वत: सह आपल्या कुटुंबातील सदस्यांचं प्रमोशन सुरु केलं होतं. बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीत चार किंवा तीन उमेदवार निवडून येतात. त्यामुळे एकाच कुटुंबात चारही तिकिटं मिळवण्याकडे स्थानिक नेत्यांचा कल दिसून येतो. स्थानिक पातळीवरील वर्चस्वाचा फायदा घेऊन कुटुंबातील अनेकांना राजकारणात स्थिरस्थावर करण्याचा प्रयत्न अनेक जण करतात. त्यामुळे प्रभागातील नागरी कामं, त्यासाठीची कंत्राटं, त्यातील टक्केवारी या सगळ्यावर वर्चस्व राखता येतं.

### कार्यकर्त्यांमध्ये नाराजी

एकाच कुटुंबातील सहा जणांना तिकिटं, मंत्री, आमदारांच्या कुटुंबियांना, नातेवाईकांना उमेदवाऱ्या यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहे. कुटुंबाला राजकारणात सेटल करु पाहणाऱ्या, त्यांनाच तिकिटं देणाऱ्या नेत्यांची लांबलचक यादी गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर पाहायला मिळत आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुका नेत्यांच्या मानल्या जातात. पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कार्यकर्त्यांच्या असतात. पण आता तिथेही नेत्यांच्या कुटुंबियांनी घाऊक प्रमाणात शिरकाव केल्यानं कार्यकर्ते अस्वस्थ आहेत.

# नंबर दोनला काही किंमत नसते

## मंत्री रवींद्र चव्हाणांनी शिंदेंना डिवचले

**मुंबई :** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय नेते ऐकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत आहेत. अशातच भाजप प्रदेशाध्य रवींद्र चव्हाण यांनी केलेल्या एका वक्तव्याची राज्यभर चर्चा होत आहे. दोन नंबर तो दोन नंबरच असतो, नंबर दोनला काही किंमत नसते, असं वक्तव्य भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केलं आहे. त्यांच्या या वक्तव्याच्या नेमका रोख कुणावर? याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.

दोन नंबर तो दोन नंबरच असतो, नंबर दोनला काही किंमत नसते असं भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी म्हटल. आर आर पाटील यांच्या जुन्या भाषणाचा संदर्भ देऊन रवींद्र चव्हाण यांनी विटा मधील नगरपरिषदेच्या प्रचारसभेत हे वक्तव्य केलं आहे. रवींद्र चव्हाण यांच्या या वक्तव्याच्या नेमका रोख कुणावर याची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. जो भी है देवाभाऊ ही है, देवा भाऊ सबका भाऊ दोन नंबर तो दोन नंबरच असतो असेही रवींद्र चव्हाण म्हणाले.

भाजप आणि एकनाथ शिंदेंची शिवसेना राज्यात सत्तेत एकत्र असले तरी नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीच्या निमित्ताने दोन्ही पक्ष एकमेकांसमोर आले आहेत. कोकणात तर या ▸▸ पान २ वर

# अजित पवारांचा देशमुख यांच्या कुटुंबीयांशी संवाद

## प्रथम पुण्यस्मरणदिनी न्याय देण्याची वैभवी देशमुखची मागणी

**बीड /प्रतिनिधी**

आज २९ नोव्हेंबर राजी मस्सजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांचे प्रथम पुण्यस्मरण असल्याने उपमुख्यमंत्री अजित पवार अचानक मस्साजोगला गेले. कोणताही नियोजित दौरा अजित पवार यांचा नव्हता. यादरम्यान अजित पवारांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबाशी संवाद साधला.आम्हाला पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नसल्याची तक्रार संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी हिने केली. यावेळी अजित पवार यांच्यासोबत नवाब मलिकदेखील उपस्थित होते.

माजलगाव, धारूर येथील सभा संपल्यानंतर अजित पवारांचा ताफा हेलिपॅडकडे न जाता मस्साजोगच्या दिशेने रवाना झाला. धारूरनंतर ते बीडकडे हेलिकॉप्टरने जाणार होते. मात्र अचानक मस्साजोगच्या दिशेने रवाना झाले आहेत. यामुळे पोलीस यंत्रणेची देखील धावपळ उडाली. संतोष देशमुख यांच्या पुण्यस्मरणानिमित्त मस्साजोगकडे सकाळपासूनच लोक जात आहेत. त्यामध्येच अजित पवार हे बीडमध्येच होते आणि अचानक त्यांनी मस्साजोगकडे जाण्याचा निर्णय घेतला.



अजित पवार यांनी ▸▸ पान २ वर

### दोषी आहे त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे

ही हत्या करणाऱ्याच्या मागं जे कोणी आहेत, त्या सर्वांना शिक्षा झाली पाहिजे. तुम्ही मोकळ्या वातावरणात एकदा तपास करा. शेवटच्या टोकापर्यंत जा. या प्रकरणात कोण कोण दोषी आहे त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे हीच आमची मागणी आहे.जर तुम्ही तपासाच थांबवत असाल तर अवघड आहे. एसआयटी, सीआयडी यांचा तपास सुरू असतानाही तपासावर एक कॅप टाकली आहे. ही कॅप काढा आणि खुलेआम तपास करा.

**– खासदार बजरंग सोनवणे**

### पीडित कुटुंब न्यायाच्या प्रतीक्षेत

बीडमध्ये संतोष देशमुख यांच्या हत्येला एक वर्ष पूर्ण झाले असले तरी पीडित कुटुंब अद्याप न्यायाच्या प्रतीक्षेत आहे. संतोष देशमुख यांच्या मुलीसह कुटुंबीयांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांच्या मते, या प्रकरणात अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. न्याय मिळवण्यासाठी सतत झगडावे लागत आहे. संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी सांगितले की, त्यांनी या संदर्भात अनेकवेळा संपर्क साधला, परंतु त्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केले जात आहे.

## संक्षिप्त बातम्या

### इसुजू मोटर्स इंडियाने सर्व्हिस सेंटरचे उद्घाटन केले

**लातूर :** ग्राहकांना सुलभ आणि विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देण्याच्या वचनबद्धतेला बळकटी देत, इसुजू मोटर्स इंडियाने लातूर, महाराष्ट्रातील लातूर येथे नवीन अधिकृत सर्व्हिस सेंटर 'गरजे मोटर्स' सुरू केले आहे. हे सेंटर एमआयडीसी लातूर येथे स्थित असून, २५००० चौ.फुट क्षेत्रात पसरलेले आहे. आधुनिक सेवा सुविधा असलेल्या या सेंटरमध्ये वाहनांची उच्च दर्जाची देखभाल व दुरुस्ती कार्य कार्यक्षमतेने पार पाडले जाईल. उद्घाटन कार्यक्रमात महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य श्री अमित देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या अधिकृत सर्व्हिस सेंटरचे उद्घाटन इसुजू मोटर्स इंडियाचे वरिष्ठ अधिकारी आणि गरजे मोटर्सचे मुख्य प्रतिनिधीं यांनी केले.

### एनबीबीएलचे बँकिंग कनेक्ट इंटरनेट बँकिंगचाअविस्मरणीयअनुभवदेणार

**छत्रपती संभाजीनगर :** नॅशनलपेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाची पूर्णमालकीची उपकंपनी असलेल्याएनपीसीआय भारतबिलपे लिमिटेडने बँकिंगकनेक्टसह डिजिटल पेमेंटचा अत्यंत आधुनिक दृष्टिकोन सादर केला आहे. हा एक नवीनइंटरऑपरेबल प्लॅटफॉर्म आहे जो इंटरनेट आणि मोबाइल बँकिंगच्या अनुभवाचीपुनर्परिभाषा करण्याचे आश्वासन देतो. आरबीआय गव्हर्नर माननीय श्री. संजय मल्होत्रायांच्या उपस्थितीत ग्लोबल फिनटेक फेस्टिव्हल २०२५ दरम्यान हे बँकिंग कनेक्ट लॉंचकरण्यात आले.आजच्या नेट बँकिंग वर्कफ्लोमध्ये अनेकदा गुंतागुंतीची ग्राहक क्रेडेन्शियल्सआणि नॉन स्टँडरडाईज्ड सेटलमेंट प्रक्रिया अशा अनेक गोष्टींची एकत्रितरित्या गरजभासते. व्यापारी आणि पेमेंट ॲग्रीगेटर ऑनबोर्डिंगला १० ते १५ दिवस लागूशकतात, ज्यामुळेपेमेंट व्यवस्थेत तणाव निर्माण होऊ शकतो.

### घुंगर्डे हदगाव येथील जि. प. शाळेत लोकवर्गणीतून शाळेचा विकास



**वडीगोद्री :** अंबड तालुक्यातील घुंगर्डे हदगाव येथील जिल्हा परिषद शाळेत आयोजित पहिल्याच पालक बैठकीत गावकऱ्यांनी आणि पालकांनी अनुकरणीय पुढाकार घेत केवळ एका तासात तब्बल २६ हजाराची लोकवर्गणी जमा केली. शाळेच्या विकासासाठी पालकांनी उत्स्फूर्तपणे आपापल्या परिस्थितीनुसार यात १ ते ५ हजारांचा समावेश होता. संकलित निधी शाळेची रंगरंगोटी, सुशोभीकरण आणि मुलांसाठी अधिक चांगले वातावरण निर्माण करण्यासाठी वापरण्यात येणार आहे. पालक आणि ग्रामस्थांकडून मिळालेला प्रतिसादामुळे जिव्हाळा, आपुलकी आणि विकासाची बांधिलकी अधोरेखित करतो. शाळा व्यवस्थापन समितीकडून गावातील माजी विद्यार्थी, दानशूर व्यक्ती आणि सर्व नागरिकांनी या उपक्रमात सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### राधाबाई गायकवाड यांचे निधन

**धर्माबाद :** शहरातील इंदिरानगर येथील रहिवासी राधाबाई गंगाराम गायकवाड मगंनाळीकर (वय ७५) यांचे बुधवारी (दि.२६) नांदेड येथे उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुन, नातु, नातवंडे असा परिवार आहे. त्या राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे सक्रिय पदाधिकारी प्रविण गायकवाड व पोलिस कर्मचारी प्रकाश गायकवाड यांच्या मातोश्री होतं.

# रब्बी हंगामासाठी इसापूर धरणातून तीन आवर्तने देण्यास मंजुरी

## १५ डिसेंबर ते ४ जानेवारी २०२६ दरम्यान पहिले आवर्तन

**कळमनुरी / प्रतिनिधी**

उर्ध्व पैनगंगा प्रकल्पांतर्गत रब्बी हंगामासाठी इसापूर धरणातून तीन आवर्तने सोडण्यास मंजुरी देण्यात आली आहे. कालवा सल्लागार समितीच्या आढावा बैठकीत शेतकऱ्यांच्या मागणीनुसार पहिले आवर्तन १५ डिसेंबर ते ४ जानेवारी २०२६ या कालावधीत सोडण्याचे ठरले असून, प्रत्येक आवर्तनाचा कालावधी २० दिवसांचा असणार आहे. शेतकऱ्यांनी या नियोजनाचा वेळेत लाभ घ्यावा, असे आवाहन विभागाचे कार्यकारी अभियंता अ.बा. जगताप यांनी केले आहे.

समितीच्या बैठकीत लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी रब्बी हंगामासाठी तातडीने पाणी सोडण्याची विनंती केली होती. त्यानुसार तीन आवर्तनांचे नियोजन करण्यात आले आहे. पहिले आवर्तन १५ डिसेंबर ते ४ जानेवारी, दुसरे आवर्तन ८ जानेवारी ते २८ जानेवारी आणि तिसरे आवर्तन ५ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सोडण्यात येणार आहे. पावसाळी अथवा आकस्मिक परिस्थितीनुसार तारखेत आवश्यक बदल करण्यात येऊ शकतात. १५ ऑक्टोबर रोजी धरणातील उपलब्ध १०० टक्के जिवंत पाणीसाठ्यावर आधारित रब्बी व उन्हाळी हंगामाचे प्राथमिक नियोजन तयार करण्यात आले आहे. उन्हाळी हंगामासाठी स्वतंत्रपणे पुढील बैठक घेऊन मान्यता दिली जाणार आहे. इसापूर प्रकल्पाच्या डावा व उजवा कालवा आणि त्याअंतर्गत वितरण व्यवस्थेद्वारे प्राप्त मागणीनुसार पाणी पुरवठा केला जाईल. सिंचनासाठी पाणी घ्यायचे असल्यास लाभधारकांनी नमुना क्र. ७ व ७-अ मधील पाणी मागणी अर्ज शाखा कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे. हंगामी व दुहंगामी पिकांसाठी स्वतंत्र अर्ज सादर करावेत. अर्जासोबत उपसा परवानगीची प्रत, अपत्य प्रमाणपत्र, तसेच अल्प किंवा अत्यल्प भूधारक असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. शेतातील शेतचारी स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी संबंधित शेतकऱ्यांची असेल. तांत्रिक कारणास्तव पाणीपुरवठ्यात अडचण आल्यास विभाग जबाबदार राहणार नाही. नियमांचे उल्लंघन झाल्यास मंजुरी रद्द करण्यात येईल. सर्व लाभधारकांनी महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम व विभागीय नियमांचे पालन करावे, असेही आवाहन कार्यकारी अभियंता जगताप यांनी केले आहे.

## सेनगाव येथे बालकांचे हक्क-अधिकार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन



**सेनगाव / प्रतिनिधी**

येथील भानेश्वर विद्यालयात २९ नोव्हेंबर रोजी तालुका विधि सेवा समिती तालुका वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने भानेश्वर विद्यालयाच्या पुढाकाराने बालकांच्या हक्क व अधिकार जागृती या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना ॲड. एम.पी. कांबळे यांनी बालकांचे हक्क व अधिकार जगण्याचा हक्क संरक्षण, शिक्षणाचा अधिकार तर आरोग्य या विषयावर ॲड. एम.पी. कांबळे यांनी मुलांचे मार्गदर्शन केले. या सदरील कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डी.आर. थिगळे, प्रमुख वक्ते ॲड. एम.पी. कांबळे, जे.एन. मददे, भानेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक बुद्रुक शाळेतील विद्यार्थीची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# तालुक्यात महसूल प्रशासनाची वचक नाहीच, वाळू-मुरूमाची अवैध वाहतूक

## पूर्णा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल, चार लाख नऊ हजाराचा मुद्देमाल जप्त

**पुर्णा / प्रतिनिधी**

तालुक्यातील लक्ष्मीनगर रस्त्यावर जिल्हा परिषद शाळेसमोर सुरू असलेली चोरटी वाळुची वाहतूक पोलिसांनी पकडली. मध्यरात्रीच्या सुमारास राबवलेल्या गस्तीत पोलिसांनी एका टिप्परसह तीन ब्रास वाळू असा एकूण सुमारे ४ लाख ९ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. चालक मात्र वाहन सोडून अंधाराचा फायदा घेत पसार झाला.

पुर्णा पोलीस स्टेशन हद्दीत रात्रगस्त दरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसानी पुर्णेतील पिंपळगावजवळ कारवाई केली. जिल्हा परिषद शाळेसमोरून विनापरवाना वाळुची चोरटी वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळताच पोलिस पथकाने छापा टाकला. यात निळ्या रंगाचा हेड आणि फिकट लाल रंगाचा एम.एच. २२ ए.डब्ल्यु. १२७९ या क्रमांकाचा टिप्पर दिसताच पोलिसांनी वाहन थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांना पाहताच वाहन रस्त्याच्या यशस्वी कडेला सोडून चालक पसार होतात अवैध वाळु माफीया अलर्ट जिल्ह्यातील पोलीसांनी केलेल्या अवैध वाळुच्या कारवाईत अध्यपिक्षा जास्त गुन्ह्यात अवैध वाळुचे वाहन सोडून चालक पसार होतांना दिसत आहे. पोलीस पथकाची कारवाई होण्या अगोदरच माहिती कोण देते अशी चर्चा जोर धरत आहे. आरोपी वारंवार पसार होत असल्याने पोलीस प्रशासनावर तपासाचा भार देखील वाढत आहे. वाहनाची तपासणी केली असता टिप्परमध्ये अंदाजे तीन ब्रास वाळु आढळून आली. मुद्देमाल जप्त करण्यात आला असून टिप्पर पुर्णा पोलीस ठाण्यात लावण्यात आला. ही कारवाई पुर्णा पोलीसांच्या पथकाकडून करण्यात आली. या प्रकरणी पोलीस स्टेशन पुर्णा येथे अनोळखी चालक व वाहन मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेचा पुढील तपास पुर्णा पोलीस करत आहेत.


# तूर पिकांवरील होणाऱ्या किडीचे एकात्मिक व्यवस्थापन

**हिंगोली / प्रतिनिधी**

जिल्ह्यामध्ये तूर पीक हे फुलोऱ्यावर आहे व काही ठिकाणी शेंगा लागण्यास सुरुवात झालेली आहे. रात्रीचे थंड हवामान तूर पिकावरील शेंगा पोखरणाऱ्या आळीच्या वाढीस पोषक असते. प्रादुर्भाव होऊन नुकसान होण्याची शक्यता असते. ढगाळ वातावरणामुळे तुरीवर शेंगा पोखरणारी अळी (घाटे अळी), पिसारी पतंग व शेंग माशी या तिन्ही किडी कळ्या, फूल व शेंगावर आक्रमण करुन तुरीच्या उत्पादनात लक्षणीय घट आणू शकतात. वेळोवेळी सर्वेक्षण करुन प्रादुर्भाव ओळखून आवश्यकतेनुसार व्यवस्थापन करण्याचा हा कालावधी आहे. शेतकरी बांधवांनी जागरुक राहुन या तिन्ही किडीच्या व्यवस्थापनासाठी आवश्यकतेनुसार खालीलप्रमाणे एकात्मिक व्यवस्थापन करावे.

फूलगळ व चट्टेगळ जास्त प्रमाणात होत असल्यास १३:००:४५ हे १०० ग्राम अधिक एनएए २ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. शेंगा पोखरणी अळी व फायटोप्थेरा मर या समस्येवर पहिली फवारणी ५० टक्के फुलोरावर असतांना निंबोळी अर्क ५ टक्के किंवा अझाडिरेक्टीन ३०० पीपीएम ५० मिली किंवा आझाडिरेक्टीन १५०० पीपीएम २५ मिली किंवा एचएएपीव्ही ५०० एलई किंवा बॉसलिस थुरिनजिएंसीस १५ मिली किंवा क्विनॉलफॉस २५ ई.सी. २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. दुसरी फवारणी पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसांनी करावी. यासाठी ४ इमामेक्टीन बेन्झोएट ५ एसजी ३ ग्रॅम किंवा लेब्डा सायहॅलोमथ्रीन ५ टक्के ईसी १० मिली किंवा ईथिऑन ५० टक्के ईसी २५ मिली किंवा क्लोनेंनट्रॅनीलिप्रोल १८.५ टक्के एससी प्रवाही २.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणीसाठी किटकनाशकाची शिफारस केलेली मात्रा साध्या पंपासाठी असून पॉवर ऑपरेटेड पंपासाठी तीन पट मात्रा वापरावी. हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी वरील उपाययोजनांचा तात्काळ अवलंब करुन तूर पिकांचे संरक्षण करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

# शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्याची हत्या



**ठाणे :** हल्लेखोर टोळक्याने रस्त्यात गाठून शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्याची निर्घुण हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना कल्याण तालुक्यातील मुरबाड महामार्गावर असलेल्या ममणोली गावानजीक घडली आहे. याप्रकरणी कल्याण ग्रामीण तालुका पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरु केला आहे. हल्लेखोर फरार झाले आहेत. मात्र या हत्याकांडाने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. किरण घोरड ( वय ३२ )असे हत्या झालेल्या शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्याचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार मृतक किरण घोरड हे कल्याण तालुक्यातील गोवेली गावात कुटुंबासह राहत होते. ते कल्याण ग्रामीण भागातील शिंदे शिवसेना गटाचे पदाधिकारी होते. त्यातच शुक्रवारी रात्रीच्या सुमारास कल्याण - मुरबाड मार्गावरील मामणोली गावात काही कामानिमित्त गेले असताना एका ढाब्यावर जेवणासाठी थांबले होते. त्याच ढाब्यावर काही तरुणाशी वाद झाला. त्यानंतर काही जणांच्या टोळक्याने त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच कल्याण ग्रामीण पोलीस पथक घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा करत अनोखळी टोळक्याविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करत घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून मृत किरणच्या अलीकडील हालचाली, संपर्कातील व्यक्ती, मोबाईल डेटा, आर्थिक व्यवहार आणि तणावग्रस्त संबंध अशा सर्व बाबींची सखोल चौकशी केली जात असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंकज गिरी यांनी दिली आहे.

दरम्यान, हत्याकांडाच्या घटनेनंतर गोवेली तसेच मामणोली परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, कुठलीही अनपेक्षित परिस्थिती उद्भवू नये म्हणून पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला आहे. काही संशयितांची चौकशी सुरू असून, वैयक्तिक राग, राजकीय वैमनस्य किंवा इतर कारणे यांपैकी कोणते कारण प्रमुख होते, याचा तपास पोलिस पथके करत आहेत. काही महत्त्वाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागल्याची माहिती मिळत असली तरी अधिकृत माहिती समोर आली नसल्याचेही सांगण्यात आले.

तर दुसरीकडे स्थानिकांमध्ये संतापाचे वातावरण पाहता काही सामाजिक कार्यकर्त्यांनी आरोपींना तातडीने अटक करावी आणि हत्येचा उलगडा करावा, अशी मागणी केली आहे. या हत्याकांडामागील नेमके कारण उलगडण्यासाठी पोलिसांची अनेक पथके कार्यरत आहेत. धागेदोऱ्यांवरून पुढील काही तासांत तपासाला गती मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात असल्याचे पोलिसांचे स्पष्ट मत असून लवकरच आरोपींना अटक केली जाणार असल्याचेही पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

# 'भाषांतर आणि अनुवाद' मुळे युवकांना रोजगारांच्या संधी



## डॉ. गणेश शिंदे यांचे प्रतिपादन

**पाचोड/प्रतिनिधी**

पाचोड येथील शिवछत्रपती महाविद्यालय मराठी विभाग व पीएम उषा योजनेअंतर्गत 'भाषांतर आणि अनुवाद' या विषयावर प्रमाणपत्र कोर्सचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाचे उद्घाटन ताराई महाविद्यालय पैठण येथील मराठी विभाग प्रमुख व प्रभारी प्राचार्य डॉ. गणेश शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी आपल्या व्याख्यानामध्ये भाषांतर क्षेत्रातील वाढत्या संधींबद्दल बोलताना सांगितले की, जगभरातील विविध भाषांमधील संवाद वाढत असून कुशल भाषांतरकारांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. युवकांना रोजगाराच्या नवनवीन वाटा या क्षेत्रात उपलब्ध होत आहेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. संतोष चव्हाण यांनी केले. त्यांनी भाषांतराचे तांत्रिक, शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रातील महत्त्व उपस्थितांसमोर उलगडून दाखवले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विलास महाजन होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात विद्यार्थ्यांनी भाषा कौशल्य वाढवून जागतिक स्तरावर करिअरच्या संधी साधाव्यात, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनोद कांबळे यांनी केले. आभार डॉ. एकनाथ शिंदे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी , विद्यार्थिनी आणि प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यात आयोजन समितीने परिश्रम घेतले.

# कला अवगत असली तरच विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडते: अपराजिता अग्निहोत्री




## सहकार महर्षी बाळासाहेब पवार संगीत महोत्सव उत्साहात

**कन्नड/ प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच विविध कार्यक्रमांत सहभाग घेणे अत्यावश्यक आहे. केवळ अभ्यास करून परिपूर्ण व्यक्तिमत्त्व घडत नाही. जीवनात एखादी तरी कला अवगत असणे गरजेचे आहे. कमी वयात विद्यार्थ्यांना एवढे मोठे व्यासपीठ मिळणे ही अत्यंत अभिमानाची बाब असल्याचे प्रतिपादन अपराजिता अग्निहोत्री यांनी केले.

शहरातील सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालय आणि बाळासाहेब पवार फाऊंडेशन यांच्यावतीने २५ व २६ नोव्हेंबर रोजी सहकार महर्षी बाळासाहेब पवार संगीत महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा उपविभागीय पोलीस अधिकारी अपराजिता अग्निहोत्री यांच्या उपस्थितीत बुधवारी (ता. २६) रोजी संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. संगीत महोत्सवात ६० संघांनी विविध कला प्रकारांत सहभाग नोंदवला. यावेळी उद्योजक मानसिंह पवार, चंद्रकांत देशमुख, डॉ. ए. के. महाले, सागर जाधव, राधा कडवकर, प्राचार्य राहुल क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, रामकृष्ण पवार, रामराव शिंदे, संजय जाधव, डॉ. रुपेश मोरे, डॉ. आर. टी. नागे, प्रा. हुकुमचंद पवार, प्रा. संतोष देशमुख, डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. उदय डोंगरे, मिलिंद पाटील, प्राचार्य डॉ. विजय भोसले, रामकृष्ण पवार, परीक्षक प्रा. राहुल शिंदे, प्रा. गणेश दळे आणि तन्मय अवसरमल आदी उपस्थित होते.

# दिव्यांगाना वाढीव मानधन मिळेना ; तहसील कार्यालयात हेलपाटे

**खुलताबाद/प्रतिनिधी**

दिव्यांगसाठीच्या मानधनात वाढ करण्यात आली. मात्र, खुलताबाद तालुक्यात वाढीव मानधन व अंत्योदय शिधा पत्रिका मिळत नसल्याने दिव्यांगाचे हेलपाटे होत असल्याने दिव्यांग त्रस्त झाले आहेत. याकडे लक्ष घालून दिव्यांगाना वाढीव मानधन व अंत्योदय शिधापत्रिका वाटप करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे. या संदर्भात जिल्हा अधिकारी छत्रपती संभाजीनगर कार्यालयात निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, दोन महिन्यांपासून मानधनात सांगण्यात येत आहे. असे असतानाही वाढीवची रक्कम दिव्यांगाना मिळत नाही. दरम्यान, प्रहार संघटनेचे तालुकाध्यक्ष शेख युसूफ यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा अधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर व तहसील कार्यालय खुलताबाद यांना निवेदन तक्रार करुन ही दखल घेण्यात येत नसल्याने दिव्यांगात नाराजी पसरली आहे.

पान १ वरून

### दितवाह चक्रीवादळ भारताच्या किनारपट्टीवर !

९०० हून अधिक बोटी सुरक्षितपणे उभ्या करण्यात आल्या आहेत. पुढील काही दिवसांत खराब हवामानाची शक्यता असल्याने मच्छिमारांना समुद्रात न जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे.दितवाहमुळे नागपट्टिनममध्ये शनिवारी सकाळपासून मुसळधार पाऊस सुरू आहे, त्यामुळे शहराच्या अनेक भागांत पाणी साचले आहे. तंजावरमध्ये मासेमाऱ्यांनी सुमारे १,५०० यांत्रिक बोटी आणि २,००० हून अधिक पारंपरिक बोटी किनारी उभ्या केल्या आहेत. रामेश्वरममध्ये दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे रहिवासी भागांत २ फुटांपर्यंत पाणी साचले आहे. दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.रामेश्वरममध्ये सोसाट्याच्या वाऱ्यासह, पावसासोबत समुद्रात उंच लाटा उसळत आहेत. रामेश्वरमला ये-जा करणाऱ्या अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. अनेक गाड्यांचा मार्ग बदलण्यात आला आहे.

### नंबर दोनला काही किंमत नसते

दोन्ही पक्षातील वाद एवढा विकोपाला गेलाय की, भाजपच्या प्रदेशाध्यक्षांनी थेट युती कधीपर्यंत टिकवायची याची तारीखच जाहीर केली आहे. सिंधुदुर्गमध्ये भाजप नेते नितेश राणे यांच्याविरोधात त्यांचे बंधू तथा शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार निलेश राणे यांनी दंड थोपटले आहेत. नुकतंच निलेश राणे यांनी मालवणमध्ये भाजप पदाधिकाऱ्याच्या घरात २५ लाखांची रोकड शोधण्याचे स्टिंग ऑपरेशन केलं. हे ऑपरेशन भाजपच्या चांगलंच जिव्हारी लागल्याचं पाहायला मिळत आहे. निलेश राणेंनी केलेल्या स्टिंग ऑपरेशनवर प्रतिक्रिया देताना भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी थेट, मला २ डिसेंबरपर्यंत युती टिकवायची आहे. त्यानंतर मी निलेश राणेंना उत्तर देईन. आत्ता मी काहीही बोलणार नाही. नंतर उत्तर देईन. निलेश राणे जे बोलत आहेत ते खोटं आहे. अशी संतप्त प्रतिक्रिया दिली.

### अजित पवारांचा देशमुख यांच्या कुटुंबीयांशी संवाद

काही वेळ संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी आणि त्यांचा भाऊ धनंजय देशमुख यांच्याशी संवाद साधला. संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराडचे नाव आले. या प्रकरणात धनंजय मुंडे यांच्यावरही काही आरोप झाले. या आरोपांनंतर धनंजय मुंडे यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर संपूर्ण राज्यभरात संतापाचे वातावरण बघायला मिळाले. अनेक मोर्चे काढली गेली.

जवळपास सर्वच नेत्यांनी मस्साजोगला जात भेट घेतली. अजित पवारांनी या प्रकरणात सुरूवातीला धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला नव्हता. त्यानंतर अचानक धनंजय मुंडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. धनंजय मुंडे यांच्याकडून परळी नगरपरिषद निवडणुकीसाठी जोरदार प्रचार केला जात आहे.

# गोरठा जि.प. शाळेतील शिक्षिकेचा विनयभंग करणाऱ्या दोन शिक्षकांविरुध्द गुन्हा दाखल

### विद्यार्थीनींसोबतही गैरवर्तन केल्याचे निदर्शनास

**उमरी / प्रतिनिधी**

गोरठा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील एका शिक्षिकेचा विनयभंग केल्या प्रकरणी २ तत्कालीन शिक्षकांवर विनयभंग व अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे.



उमरी तालुक्यातील मौजे गोरठा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा आहे. या शाळेत कार्यरत एका शिक्षिकेला शाळेत तत्कालीन कार्यरत २ शिक्षकांनी मानसिक छळले. तसेच, तिची वारंवार छेड काढत अश्लील हावभाव करीत या दोन नराधमांनी शिक्षिकेचा विनयभंग केला. हा प्रकार मागील तीन वर्षांपासून सुरु होता. याबाबत त्रस्त पीडिता शिक्षिकेने वरिष्ठ अधिकारी व यंत्रणेकडे दाद मागूनही काही कारवाई न झाल्याने पीडितेने राष्ट्रीय महिला आयोगाकडे ऑनलाईन तक्रार केली. या तक्रारीची दखल आयोगाने घेतल्यानंतर आरोपी शिक्षक दिगंबर रामदास अंबुलगे सध्या नोकरी जि.प. शाळा बितनाळ ता. उमरी आणि स्वयंक गणेश सावंत सध्या जि.प. शाळा भानेगाव (ता. हदगाव) यांच्याविरुध्द विविध कलमान्वये विनयभंग व अ‍ॅट्रॉसिटी प्रमाणे उमरी पोलीस ठाण्यात २४ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी डी.एस. पाटील करीत आहेत. पोलीस निरीक्षक जयप्रकाश गुट्टे, पोलिस अंमलदार गंगाधर कदम व सुरेश भालेराव हे मदत करीत आहेत.

या गुन्ह्याच्या अनुषंगाने गोरठा येथील जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळेला पोलिसांनी भेट दिली असता सदर शिक्षिकेसोबतच नव्हे तर विद्यार्थीनींसोबतही या शिक्षकांनी गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आले आहे. या दोन्ही शिक्षकांच्या गैरवर्तनाबाबत महिला शिक्षिकांनी गटशिक्षणाधिकारी उमरी व नांदेड जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे वारंवार तक्रारी करुनही तत्कालीन व विद्यमान अधिकाऱ्यांना या घटनेचे गांभीर्य न समजणे संतापजनक असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. दोन्ही आरोपी फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले. सदर दोन शिक्षकावर उमरी पोलिसात गुन्हा दाखल होताच तालुक्यातील गटशिक्षण विभागामध्ये खळबळ उडाली आहे.

# कृष्णूर एमआयडीसीत तरुणावर बिबट्याचा हल्ला

**कृष्णूर / प्रतिनिधी**

कृष्णर एमआयडीसी परिसरात श्रीकांत पोपुलवाड या तरुणावर बिबट्याचा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. हल्ल्यात जखमी झालेल्या श्रीकांत पोपुलवाड यांच्यावर घुंगराळा येथील डॉ. राठोड यांच्या दवाखान्यात प्राथमिक उपचार करण्यात आले आहेत. जखमी श्रीकांत पुपुलवाड यांची राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेश सरचिटणीस वसंत सुगावे पाटील यांनी भेट घेऊन वनपरिक्षेत्राधिकारी देवकत्ते यांच्याशी संपर्क करून जखमींची भेट करून दिली. वन विभागाची टिम बिबट्याला पकडण्यासाठी आली असून घुंगराळा, कृष्णर भागातील नागरिक, शेतकरी, कामगारांनी सतर्क रहावे, बिबट्या कुठे आढळून आल्यास वनविभागाकडे संपर्क करावा, असे आवाहन वनपरिक्षेत्राधिकारी देवकत्ते यांनी केले आहे.



# नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी रुग्णसेवा आत्मीयतेने करावी



### डॉ. व्यंकटराव भोसले सुभेदार यांचे प्रतिपादन

**मुखेड :** छत्रपती शिवाजी महाराज सेवाभावी संस्था तांदळी संचलित कै. मथुराबाई इंगळे नर्सिंग कॉलेजच्या लॅम्प लायटींग शपथ ग्रहण व कार्यक्रमाचे अयोजन करण्यात आले होते. संगणक प्रयोग शाळेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी रुग्णसेवा आत्मीयतेने करावी, असे प्रतिपादन संगणक कक्षाचे डॉ. व्यंकटराव भोसले सुभेदार यांनी केले. कार्यक्रमात संगणक कक्षाचे डॉ. व्यंकटराव भोसले सुभेदार व डॉ. कैलास चांडोळकर, संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर पाटील यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले. नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांना सामुहिक शपथ देण्यात आली. या कार्यक्रमात डॉ. व्यंकटराव भोसले सुभेदार यांनी रुग्ण व नर्सिंग यांच्यातील आणि डॉक्टर व नर्सिंग यांच्यातील कामाचे स्वरूप विषयी माहिती दिली. डॉ. कैलास चांडोळकर यांनी रुग्णांची सेवा कशी करावी याबाबत माहिती दिली. तसेच, शंकर जांभळीकर, विश्वा गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच, ज्ञानेश्वर गोगुरवार, कोमल पवार, मनसुबी शेख या विद्यार्थ्यांची भाषणे झाली. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर तांदळीकर, शंकर जांभळीकर, रावसाहेब माकणीकर, प्रकाश होनवडजकर, माधवराव कारभारी, बाबुराव शिंदे, ग्रामसेवक के.एस. देवकते, अमोल वाकोडे, केशव इंगळे, मोतीराम पवार, उद्धव शिंदे, एकनाथ वडजे, ज्ञानेश्वर वडजे, महेश इंगळे, पाडूरंग पांचाळ, राजू जाधव, सुभाष गोपनर, गोपाळ जाधव, नामदेव जाधव, दत्ता जाधव, ज्ञानेश्वर ढगे, पुंडलिक मेथे, संतोष मेथे, गोपिनाथ पांचाळ, रामदास पांचाळ, शेरिफ शेख, गावकरी व मान्यवर उपस्थित होते.

# सीसीआय कापूस खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी अनिवार्य

### १ हजार २९ शेतकऱ्यांचे अर्ज त्रुटीत

**किनवट / प्रतिनिधी**

शासनाच्या हमीभाव खरेदी योजनेंतर्गत किनवट येथील सीसीआय कापूस खरेदी केंद्राला सुरूवात झाली आहे. यासाठी कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी करणे बंधनकारक असून, नोंदणी प्रक्रियेत अनेक शेतकऱ्यांनी अपलोड केलेल्या कागदपत्रांत त्रुटी आढळल्याने त्यांच्या अर्जांची पडताळणी अडथळ्यात आली आहे. किनवट तालुक्यातील १ हजार ४२२ शेतकऱ्यांनी २८ नोव्हेंबरपर्यंत ऑनलाईन नोंदणी केली असली, तरी त्यापैकी १ हजार २९ शेतकऱ्यांचे अर्ज त्रुटीमध्ये आढळले आहेत. अशीही माहिती सभापती मुंडे यांनी दिली.



सातबारा उतारा, आधार क्रमांक व छायाचित्र योग्य प्रकारे अपलोड न केल्याने ही समस्या निर्माण झाल्याची माहिती किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन गोविंदराव मुंडे यांनी दिली. सीसीआय केंद्रावर कापूस विक्रीसाठी नोंदणी अनिवार्य असल्याने त्रुटीत आलेल्या अर्जांची दुरुस्ती तात्काळ करून कागदपत्रे योग्यप्रकारे पुन्हा अपलोड करण्याचे आवाहन सभापती मुंडे यांनी केले आहे. त्रुटी दुरुस्त न झाल्यास शेतकऱ्यांना कापूस खरेदी प्रक्रियेत अडचणी येऊ शकतात, अशीही माहिती त्यांनी दिली. नोंदणी व कागदपत्र अपलोड संदर्भात शेतकऱ्यांना अडचणी आल्यास सभापती गजानन मुंडे, उपसभापती राहुल नाईक, सहाय्यक निबंधक दीपक गायकवाड, सचिव रविंद्र राठोड, तसेच कर्मचारी नितीन विठ्ठल राठोड यांच्याशी थेट संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. याशिवाय विजय कॉटन अ‍ॅग्रो प्रोसेसिंग इंडस्ट्रीज, चिखली फाटा, किनवट येथेही शेतकऱ्यांना मार्गदर्शन उपलब्ध आहे. तसेच, शेतकरी ८६९८ ०९१५३९ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात, अशी माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने देण्यात आली.

# 'गुड टच अन् बॅड टच' याबाबत लवकरच जनजागृती करणार



### डॉ. भाग्यश्री घाळे यांची माहिती, गीताचे छायांकन पूर्ण

**मुक्रमाबाद / प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून लहान मुलांवरील अत्याचारांच्या अनेक संतापजनक घटना समोर येत असतानाच, बालकांमध्ये व पालकांमध्येही गुड टच आणि बॅड टच याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने डॉ. भाग्यश्री घाळे यांनी तयार केलेल्या अत्यंत महत्त्वपूर्ण गीताचे छायांकन नुकतेच पूर्ण झाले आहे. या गीताचे लेखन डॉ. भाग्यश्री घाळे यांनी केले असून, याचे चित्रीकरण उदगीर येथील ब्राईट स्टार हायस्कूल येथे संपन्न झाले.

या गीताच्या मुहूर्ताचा कार्यक्रम प्रा.डॉ. वीरभद्र घाळे यांच्या हस्ते पार पडला. मुलांना समजेल अशा सोप्या आणि प्रभावी शैलीत गुड टच-बॅड टच या विषयावरील माहिती डॉ. भाग्यश्री घाळे यांनी या गीतातून मांडली आहे. यापूर्वी त्यांनी सीपीआर या महत्त्वपूर्ण वैद्यकीय विषयावरही एक जनजागृती गीत लेखनबद्ध केले असून, त्या मागील दहा वर्षांपासून वैद्यकीय क्षेत्रात आपली सेवा बजावत आहेत. या गीताचे दिग्दर्शन कृष्णा काकरे यांनी केले असून, छायांकन गुलाब चव्हाण, तसेच पोस्टर डिझाईन मनोज झुंगा यांनी केले आहे. ब्राईट स्टार हायस्कूल आणि मानसी प्रॉडक्शन्स यांच्या संयुक्त विद्यमाने हे गीत प्रदर्शित करण्यात येणार आहे. लहान मुलांमध्ये जागरूकता वाढावी, त्यांना चांगलेवाईट ओळखण्याची समज विकसित व्हावी, आणि एक डॉक्टर तसेच एक आई म्हणून मुलांबद्दलच्या काळजीतून व आपुलकीतून हे गीत तयार केल्याचे डॉ. भाग्यश्री घाळे यांनी सांगितले. हे गीत लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार असून, त्याचे प्रसारण लवकरच त्यांच्या यूट्यूब चॅनेलवर करण्यात येणार आहे, तसेच ब्राईट स्टार हायस्कूलमध्ये या गीताचे विशेष प्रदर्शन आयोजित केले जाणार आहे.

# भारतीय संविधान जगातील सर्वोत्कृष्ट संविधान

### प्रा.डॉ. मारोती गवलवाड यांचे प्रतिपादन, संविधान दिन उत्साहात साजरा

**मुखेड / प्रतिनिधी**

शहरातील महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २६ नोव्हेंबर भारतीय संविधान दिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. भारतीय संविधान हे समाजात सामाजिक समता प्रस्थापित करण्याकरिता अविरत कार्य करीत आहे. संविधान एक महत्वाचे दस्तावेज आहे. त्याची योग्य अंमलबजावणी महत्वाची आहे. भारतीय संविधान जगातील सर्वोत्कृष्ट संविधान आहे, असे मार्गदर्शन राज्यशास्त्र विभागातील प्रा.डॉ. मारोती गवलवाड यांनी प्रतिपादित केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.बी. अडकीने, प्रमुख मार्गदर्शक प्रा.डॉ. मारोती गवलवाड, प्रमुख पाहुणे प्रा. एस.बी. बळवंते हे उपस्थित होते. प्रास्ताविक सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.डॉ. एम.के. राऊत, सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. चंद्रकांत एकलारे तर आभार प्रदर्शन मराठी विभागातील प्रा.डॉ. विजय वारकड यांनी केले. प्रतिमा पूजन करून मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. एस.बी. अडकीने यांना महाविद्यालयीन परिवाराच्या वतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्वांनी राष्ट्रगीत व संविधान उद्देश पत्रिकेचे वाचन केले. मार्गदर्शक डॉ. गवलवाड यांनी मार्गदर्शन प्रसंगी बोलताना संविधान हे देशाला आनंदाचे वातावरण व स्वाभिमानाचे बळ देते. समतेचा सूर्य देशाला प्रगतीच्या वाटेवर घेऊन जातो. स्वातंत्र्याचे महत्व केवळ संविधानामुळेच टिकून आहे. प्रत्येक भारतीय संविधान अभ्यासले पाहिजे. ज्यामुळे देशाचा गौरव नक्कीच वाढू शकतो असे विचार मांडले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ. अडकीने यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय हे संविधानाचे चार आधारस्तंभ आहेत. संविधान दिलेल्या हक्क व अधिकार अबाधित ठेवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या भरीव कार्याचा उल्लेख याप्रसंगी करण्यात आला. यावेळी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय होती.

# घुंगराळा येथील खंडोबा यात्रेतील कृषी, पशु प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद

### शेतकऱ्यांनी लावले विविध स्टॉल्स, चिया पिकासह आधुनिक शेतीची माहिती

**कृष्णूर / प्रतिनिधी**

घुंगराळा ता. नायगाव येथील खंडोबा यात्रेत भव्य कृषी व पशू प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या कृषी व पशु प्रदर्शनाचे उद्घाटन राष्ट्रवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष शिवराज होटाळकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जि.प. सदस्य बालाजीराव बच्चेवार होते तर प्रमुख अतिथी म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्या पुनम पवार, कुंटूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती बाळासाहेब धर्माधिकारी, माजी जि.प. सदस्य सूर्याजी चाडकर, कृ.उ. बाजार समिती कुंटुरचे माजी सभापती शिवाजी जाधव, रावसाहेब जाधव कृष्णरकर, राष्ट्रवादी पक्षाचे नायगाव माजी तालुकाध्यक्ष विश्वनाथ बडूरे उपस्थित होते.




कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेशसरचिटणीस तथा उपसरपंच वसंत सुगावे यांनी केले. या कार्यक्रमास तालुका कृषी अधिकारी देवरे, पंचायत समितीचे कृषी अधिकारी जोंधळे, कृषी सहाय्यक शिंदे या बरोबरच पशुधन विकास अधिकारी श्रीमती भालेराव, डॉ. भालेराव, डॉ. कुपलवार, डॉ. तेनलावार आदी अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. या कृषी प्रदर्शनात बाबुराव जोगदंड यांनी चिया या पिकाबद्दल माहिती सांगून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमातील मान्यवरांनी ही शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून आधुनिक शेती करण्यासंदर्भात विस्तृतपणे माहिती सांगितली. यावेळी मांडणीचे सरपंच गोविंद ताटे, सावरखेडचे सरपंच धोंडिबा इजगिरे, आंतरगावचे आनंदराव शिंदे, बळवंत शिंदे, देगावचे रावसाहेब मोरे, देगावचे माजी उपसरपंच पांडू मोरे आदी गावांसाहित पंचक्रोशीतील आजी-माजी लोकप्रतिनिधी उपस्थित होते. तसेच, या कृषी प्रदर्शनात पळासागाव, टाकळगाव, सोमठाणा, ताकबीड येथील भाजीपाला उत्पादक शेतकरी त्यांच्या शेतातील पिकवलेला भाजीपाला घेऊन कृषी प्रदर्शनास उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माजी विस्तार अधिकारी दंडेवाड, माजी विस्तार अधिकारी मातावाड, से.स.सो. संचालक संभाजीराव तुरटवाड, मा. ग्रा. पं. सदस्य बालाजीराव हाळदेवाड, मा. ग्रा.पं. सदस्य प्रतिनिधी प्रल्हादराव ढगे, चेअरमन श्यामराव यमलवाड, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष माधव ढगे, गोविंदराव शिंदे, माजी उपसरपंच शिवाजी ढगे, तंटामुक्ती अध्यक्ष श्याम ढगे, माजी ग्रामपंचायत सदस्य गंगाधर ढगे, माजी ग्रा.पं. सदस्य प्रतिनिधी मुरहारी तुरटवाड, ज्ञानेश्वर मरवाळे, परबता हणमंते गुरुजी, राम सुगावे, गजानन जलदेवार, गंगाधर सूर्यवंशी, राजू आलगटलेवार, विकास बोंडले, रावसाहेब सुगावे, साईनाथ सुगावे, प्रदीप सुगावे, सुरेश जक्केवाड, राजेश ढगे, गणेश सुंकेवार, राहूल सावकार बंदमवार, व्यंकराव बोधनकर, विलास ढगे, खंडेश्वर ढगे, विलास सुगावे, राहुल हंबर्डे, शंतनू ढगे, मोहन सुगावे, उमेश कदम आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामविकास अधिकारी हणमंत शिंदे यांनी केले. या कार्यक्रमास पंचक्रोशीतील अनेक शेतकरी, पशुपालक यांची उपस्थिती होती.

**शेतकऱ्यांचे विविध पिकांचे, फळांचे स्टॉल**

या कृषी प्रदर्शनात कृषी विज्ञान केंद्र, सगरोळी, स्वराज मशनिरी व हार्डवेअर, चिया सिड्स, रॉयल फर्टिलायजर्स अँड केमिकल्स पुणे, रानमुखा अग्रो लि. पुणे, बालसन ठिबक सिंचन, गायत्री मेट्रो एलिमेंट्स केमिकल पुणे यांसह शेतकऱ्यांचे विविध पिकांचे, फळांचे स्टॉल लावण्यात आले होते. पशु प्रदर्शनात गाय, बैल, कुत्रा, रेडा, लाल कंधारी बैल यांसह विविध प्राणी आले होते. पशु प्रदर्शनात गाय गटात सुधाकर सायरेड्डी जडलावर यांच्या गाईस प्रथम, वामन हंबर्डे यांच्या गाईस द्वितीय, विठ्ठल पुयड यांच्या गाईस तृतीय पारितोषिक मिळाले, वळू गटात अर्जुन जाधव यांच्या वळूस प्रथम, हणमंत बोगटे यांच्या वळूस द्वितीय, श्रीपत शिंदे यांच्या वळूस तृतीय पारितोषिक मिळाले, तर वासरांच्या गटात प्रथम व्यंकट सूर्यवंशी यांच्या वासरास तर द्वितीय प्रताप बोधापल्ले तर तृतीय सुनील अनेराये यांच्या वासरांना पारितोषिके मिळाली.

# सत्तासंघर्ष चरमसीमेवर

देशभरात काँग्रेसची अत्यंत दयनीय स्थिती आहे. बिहार विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या हाती काही पडले नाही. दक्षिणेतील कर्नाटक व तेलंगणा आणि उत्तरेतील हिमाचल प्रदेश अशा चार राज्यांत काँग्रेसची सत्ता आहे. याशिवाय झारखंडमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा घटक म्हणून काँग्रेसचा सत्तेत सहभाग आहे. केंद्रशासित जम्मू-काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्सच्या सरकारला काँग्रेसचा पाठिंबा आहे, पण तेथे सत्तेत सहभाग नगण्य आहे. ज्या चार राज्यांत काँग्रेसची स्वबळावर सत्ता आहे, त्यांपैकी हिमाचल प्रदेश हे सर्वांत लहान, तर कर्नाटक सर्वांत मोठे राज्य आहे. सर्वांत मोठ्या कर्नाटकमध्ये सत्तासंघर्ष गेल्या १५ दिवसांपासून सुरू आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना हटवून आपल्याला मुख्यमंत्रिपद मिळावे म्हणून उपमुख्यमंत्री व काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवकुमार यांनी जोरदार हालचाली सुरू केल्या आहेत. सिद्धरामय्या मुख्यमंत्रिपद सोडण्यास तयार नाहीत, तर शिवकुमार मागे घटण्यास तयार नाहीत. चरमसीमेवर पोहोचलेला सत्तासंघर्ष काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वासमोर आहे. अडीच वर्षांपूर्वी म्हणजे मे २०२३ मध्ये कर्नाटकात काँग्रेसला सत्ता मिळाली तेव्हा शिवकुमार हे मुख्यमंत्रिपदाचे दावेदार होते. काँग्रेसला तेथे बहुमत मिळवून देण्यात त्यांचा मोठा वाटा होता. सिद्धरामय्या यांना मानणाऱ्या आमदारांची संख्या अधिक असल्याने शिवकुमार यांना माघार घ्यावी लागली होती; परंतु अडीच वर्षांनंतर मुख्यमंत्री करण्याचे तोंडी आश्वासन काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने त्यांना दिले होते. दिलेला शब्द पाळा, असे म्हणत शिवकुमार यांनी बरोबर अडीच वर्षांनंतर मुख्यमंत्रिपदावर दावा केला आहे. त्यामुळे राज्यात निर्माण आलेल्या सत्तासंघर्षावर तोडगा काढण्याचे आव्हान पक्षाच्या नेतृत्वासमोर उभे राहिले आहे. महाराष्ट्रात शिवसेना-भाजपा युतीला २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत बहुमत मिळाल्यानंतर पहिल्या अडीच वर्षांसाठी मुख्यमंत्रिपद कोणाकडे यावरून मोठा वाद झाला. मुख्यमंत्रिपद मिळत नसल्याने शिवसेनेने भाजपाशी काडीमोड घेऊन काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या विरोधकांशी हातमिळवणी केल्याने एक नवीन समीकरण तयार झाले आणि उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले होते. कर्नाटक विधानसभा निवडणुकीचा निकाल मे २०२३ मध्ये लागल्यानंतर काँग्रेसमधील दोन नेत्यांमध्ये पहिल्यांदा अडीच वर्षांसाठी मुख्यमंत्री कोण होणार यावरून वाद सुरू झाला. सिद्धरामय्या आणि डी. के. शिवकुमार या दोन प्रबळ नेत्यांनी मुख्यमंत्रिपदावर दावा केल्याने तिढा निर्माण झाला होता. आपण शेवटची निवडणूक लढवली असून, आपले वय झाल्याने पहिल्या अडीच वर्षांवर मुख्यमंत्रिपदासाठी सिद्धरामय्या यांनी दावा केला. ते एकदा मुख्यमंत्री झालेले असल्याने पहिली संधी आपणास मिळावी, असा दावा शिवकुमार यांनी केला होता. मुख्यमंत्रिपद मिळत नसले, तरी पक्षातून बाहेर पडण्याचे किंवा बंड करण्याचे दोन्ही नेत्यांचे मार्ग बंद झालेले होते. काँग्रेसला २२४ पैकी १३५ जागा मिळाल्याने विरोधी पक्ष भाजपा आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाला तोडफोडीचे राजकारण करण्याची संधी नव्हती. त्यामुळे पक्षात राहून काँग्रेस पक्षश्रेष्ठींचा निर्णय मान्य करण्याशिवाय दोन्ही नेत्यांसमोर पर्याय नव्हता. मुख्यमंत्रिपद मिळत नसेल, तर उपमुख्यमंत्रिपदही अव्हेरून साधा आमदार म्हणून पक्षात काम करण्याची टोकाची भूमिका शिवकुमार यांनी घेतली होती. शिवकुमार यांनी उपमुख्यमंत्रिपद स्वीकारले नसते, तर तेव्हाच सत्तासंघर्ष तीव्र झाला असता. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना नेता निवडण्याचे अधिकार कर्नाटक काँग्रेसच्या नवनिर्वाचित आमदारांनी दिले होते. त्यांनी दोन्ही नेत्यांशी संवाद साधून समझौता घडवून आणण्याचा प्रयत्न केला. नेता निवडीच्या बैठकीसाठी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, पक्षाचे सरचिटणीस जितेंद्र सिंह आणि माजी सरचिटणीस दीपक बाबारिया यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती केली होती. या निरीक्षकांनी आमदारांशी चर्चा करून त्यांचा कल जाणून घेतला तेव्हा सिद्धरामय्या यांचे पारडे जड असल्याचे लक्षात आले. तीन निरीक्षकांच्या अहवालानंतर सिद्धरामय्या यांना मुख्यमंत्री करण्याचा निर्णय पक्षाध्यक्ष खर्गे यांनी घेतला होता. पण शिवकुमार माघार घेण्यास तयार नसल्याने शेवटी राहुल गांधी व सोनिया गांधी यांना या प्रकरणात लक्ष घालावे लागले. सोनिया गांधी यांनी शिवकुमार यांना उपमुख्यमंत्रिपद स्वीकारण्यास राजी केल्याने तिढा सुटला. सिद्धरामय्या यांचा मुख्यमंत्रिपदाचा कार्यकाळ किती असेल, याविषयी काहीही माहिती देण्यात आली नसली, तरी ते पहिले अडीच वर्षे मुख्यमंत्री राहणार असल्याचे संकेत होते. सिद्धरामय्यांना पहिली दोन वर्षे देऊन राहिलेली तीन वर्षे शिवकुमार यांना मुख्यमंत्रिपद देण्याचा एक प्रस्ताव होता. पण हा प्रस्ताव शिवकुमार यांनी त्याचवेळी नाकारून प्रथम संधी देण्याचा आग्रह कायम ठेवला होता. उपमुख्यमंत्रिपदाबरोबरच लोकसभा निवडणुकीपर्यंत प्रदेशाध्यक्ष त्यांच्याकडे ठेवण्याचा निर्णय पक्षश्रेष्ठींनी घेतलो. 'सर्वकाही ठीक आहे आणि यापुढेही सर्व चांगलं होईल. आपल्या सर्वांना एकत्र काम करायचं आहे आणि ते आपण स्वीकारलं आहे, असे राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खर्गे यांनी सांगितले आहे', असे शिवकुमार यांनी म्हटले होते. पण दोन-अडीच वर्षे संपण्याची वाट ते पाहत होते. अडीच वर्षांनंतर सिद्धरामय्या राजीनामा देऊन शिवकुमार यांच्याकडे ते राज्याचा कारभार सोपवतील, असे गृहीत धरण्यात आले होते. अडीच वर्षांनंतर सिद्धरामय्या राजीनामा देण्यास तयार नाहीत. अडीच वर्षांची मुदत पूर्ण झाल्याने शिवकुमार यांच्या समर्थकांनी उचल खाल्ली असून, शिवकुमार यांना मुख्यमंत्री करण्याच्या मागणीसाठी दिल्ली गाठली आहे. काँग्रेसचे अध्यक्ष खर्गे हेही कर्नाटकातलेच, पण या वादात मध्यस्थी करण्याऐवजी पक्षाचे नेतृत्व यातून मार्ग काढेल, असे ते म्हणत आहेत. अध्यक्ष या नात्याने खर्गे काहीच निर्णय घेऊ शकत नसतील तर त्यांचे पक्षाचे अध्यक्षपदही नावालाच उरते. दिल्लीहून परतल्यानंतर स्वतः सिद्धरामय्या आपणच यापुढेही मुख्यमंत्री राहू आणि राज्याचा अर्थसंकल्पही मांडू, असे सांगितले. काँग्रेस नेतृत्वाकडून अभय मिळाल्याचे संकेत देतानाच पक्षाचे वरिष्ठ नेते जो निर्णय देतील तो मान्य करू, असे त्यांनी म्हटले आहे. मात्र, पक्षाचे नेते कोणताही निर्णय घेण्यास तयार नाहीत. त्यामुळे मुख्यमंत्री बदलाचा संभ्रम अधिकच वाढला आहे. ही संभ्रमावस्था कायम राहिली, तर या स्थितीचा फायदा उठवण्यास भाजपा टपून बसलेला आहे. कर्नाटकातील मुख्यमंत्रिपदाचा वाद केवळ सिद्धरामय्या व शिवकुमार या दोन व्यक्तींच्या मुख्यमंत्रिपदाच्या वैयक्तिक दाव्याचा वाद नाही, तर तो व्यापक राजकीय धोरणात्मक आणि पक्ष प्रतिष्ठा यांचा वाद आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी यात तातडीने हस्तक्षेप केला नाही, तर कर्नाटकसारखे मोठे राज्य काँग्रेसच्या हातून जाण्याची शक्यता तितकीच अधिक. अडीच वर्षांनंतर मुख्यमंत्रिपद देण्याचा अलिखित करार पक्षातील पाच-सहा व्यक्तींमधील गुप्त असल्याचे शिवकुमार यांनी म्हटल्याने पक्षाच्या गोटात तणाव वाढला आहे. दोन्ही नेते आणि त्यांचे समर्थक आमदार यांच्या उलटसुलट विधानांमुळे पक्षाच्या ऐक्याला धोका पोहोचण्याची वेळ निर्माण झाली आहे. दिलेल्या शब्दाला जागा, असे शिवकुमार म्हणत आहेत.

# पालकांनी मुलांना योग्य संस्कार देणे काळाची गरज!

आजकालची युवा पिढी संस्काराच्या अभावामुळे बिघडत असल्याचे चित्र आपण सर्वजण पाहत आहोत. मुलांना योग्य वयात योग्य संस्कार मिळत नसल्यामुळे मुले संस्कारहीन बनली आहेत. संस्काराच्या अभावामुळे मुले माणसासारखे न वागता कसेही गैरवर्तन करून माणुसकीला गालबोट लावत आहेत. शिक्षण शिकायचे सोडून शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर फेकले जात आहेत. माणसातील माणुसकीचे गुणधर्म लोप पावल्यामुळे देशात बलात्कार, व्याभिचार, अत्याचार, अनाचार व भ्रष्टाचार फोफावला आहे. रोज दिवसाढवळ्या देशात महिलांवर व मुलींवर बलात्कार केले जात आहेत.

लहान चिमुरडी असो अथवा म्हातारी असो, बलात्कारी बलात्कार करून मोकळे होत आहेत. शासनदेखील त्यांना कठोर शिक्षा देत नाही. दररोज वर्तमानपत्रांत बलात्काराच्या बातम्या छापून येत आहेत. बलात्काराचे वाढते प्रमाण पाहून माणसाचे मन सुन्न होत आहे. एकेकाळी या देशात महिलांना व मुलींना खूप मानसन्मान दिला जायचा. महिलांकडे वाईट नजरेने बघायची कोणाची हिंमत व्हायची नाही. दुसऱ्यांच्या मुलीला बहीण व दुसऱ्याच्या आईला आई मानणारी माणसे आता अस्तित्वात राहिली नाहीत. हल्ली माणसांवर योग्य संस्काराची पेरणी न केल्यामुळे मुले व मुली मनात आले तसे वर्तन करून आई-वडिलांचे नाव खराब करत आहेत. खरेतर मुले लहानाची मोठी होताना मुलांना योग्य संस्काराच्या छायेखाली लहानाची मोठी करणे प्रत्येक आई-वडिलांचे परमकर्तव्य असते. परंतु आजकाल कोणतेच आई-वडील आपल्या मुलांवर योग्य संस्काराची पेरणी करत नाहीत. मुलांना अतिलाडात वाढवतात आणि त्यांना कसेही मोकाट हिंडू देतात. मुलांचे अतिलाड केल्यामुळे मुले आई-वडिलांना घाबरत नाहीत. आई-वडिलांचा मानसन्मान करत नाहीत.

आई-वडिलांना शिव्या देतात, सार्वजनिक ठिकाणी त्यांचा अपमान करतात आणि म्हातारपणात त्यांना वृद्धाश्रमात पाठवतात. दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा असा की, संस्काराच्या अभावामुळे मुले शैक्षणिक प्रवाहाच्या बाहेर जाऊन कुठेही भरकटत जात आहेत. आज जर देशात पाहिले तर कित्येक मुले संस्काराअभावी व शिक्षणाअभावी विनाशाच्या उंबरठ्यावर उभी आहेत. देशात बलात्काराचे प्रमाण वाढणे, व्यसनाचे प्रमाण वाढणे,



आई-वडिलांना वृद्धाश्रमात पाठवणे, ज्येष्ठांचा अनादर करणे, महिलांकडे वाईट नजरेने पाहणे किंवा पत्नीवर संशय घेणे, हे केवळ आणि केवळ माणसाला संस्कार योग्य वेळी

**बुद्धभूषण कांबळे**
**७४९८७१५६६१**

न भेटल्यामुळे असे प्रकार घडत आहेत. शिक्षण व्यवस्थासुद्धा म्हणावी तेवढी प्रबळ व सशक्त राहिली नाही.

शिक्षकांच्या वागण्यामुळे गुरु-शिष्याच्या नात्यातील पावित्र्य कलंकित होत आहे. आई-वडिलांनंतर जर कोणी विद्यार्थ्यांवर संस्काराची रुजवण करत असेल तर ते शिक्षक करत असतात. परंतु हल्ली हेच शिक्षक आज व्यसनी, आळशी, कामचुकार, कर्तव्यहीन आणि टंगळमंगळ करणारे झाले आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून संस्काराची योग्य रुजवण होत नसल्यामुळे विद्यार्थीसुद्धा दिशाहीन व व्यसनाधीन बनत चालली आहेत. त्यांना आवर घालणारे कोणीच राहिले नाही. आई-वडिलांचे अतिलाड, त्यात मोबाइलचे व्यसन आणि मोबाइलमध्ये नको ते व्हिडीओ पाहून विद्यार्थी वाममार्गाला लागत आहेत. स्वतःच्या हाताने स्वतःचे नुकसान करून घेत आहेत.

विद्यार्थी असे वागण्याला केवळ आणि केवळ त्यांचे आई-वडीलच कारणीभूत आहेत. कारण आई-वडिलांनी त्यांना योग्य वयात योग्य संस्काराची रुजवण न केल्यामुळे विद्यार्थी संस्कारहीन व अविचारी बनत आहेत. श्यामची आई हे पुस्तक वाचताना श्यामच्या आईने श्यामवर संस्काराची कशी रुजवण केली आणि श्यामचे जीवन कसे घडत गेले, हे आपल्याला त्या पुस्तकात वाचायला मिळते. राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवरायांवर स्वच्छ व नितळ सुविचारांची व संस्काराची पेरणी करून छत्रपती शिवरायांना आदर्श राजे म्हणून घडवले. छत्रपती शिवरायांच्या शिवशाहीत कोणत्याच पुरुषाची कोणत्याच स्त्रीकडे वाईट नजरेने पाहण्याची हिंमत होत नव्हती. छत्रपती शिवरायांनी परस्त्रीला मातेसमान मानले. राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवरायांवर योग्य वयात योग्य संस्कार केल्यामुळेच छत्रपती शिवरायांनी स्वराज्य निर्माण केले. आपण विचार करून बघा की, ज्या आई-वडिलांनी आपल्या मुलांवर योग्य संस्कार केलेत, ती मुले आई-वडिलांना एकटे सोडून कधीच राहत नाहीत. शेवटपर्यंत आई-वडिलांना जीवापाड सांभाळतात आणि त्यांना आपले दैवत मानतात. आई-वडिलांच्या संस्काराच्या छायेखाली लहानाची मोठी झालेली मुले कधीच वाममार्गाला जात नाहीत. खूप खूप अभ्यास करून व मनात मोठी जिद्द ठेवून यशोशिखर गाठतात. आपल्यापेक्षा वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवतात.

आई-वडिलांना कधीच शिवीगाळ करत नाहीत किंवा त्यांना अपशब्द वापरत नाहीत. म्हणून पालकांनी आपल्या मुलांना योग्य वयात योग्य संस्कार देऊन त्याला चांगला नागरिक बनवणे आपले परम कर्तव्य आहे. बालवयात मुलांवर संस्कार केले तर ते कायमस्वरूपी टिकतात. बालपणी मुलाचे मन मेणासारखे मऊ असते त्याला आपण जसा आकार देऊ तसे ते घडत जाते. म्हणून प्रत्येक आई-वडिलांना माझी कळकळीची नम्र प्रार्थना आहे की, पालकांनो आपल्या मुलांना अगोदर संस्काराची रुजवण करून चांगला नागरिक बनवा. त्याला आपल्या धाकात ठेवा. तो रोज काय करतो व त्याचे मित्र कोण आहेत? याची खात्री करून त्यांच्यावर रोज पाळत ठेवा. तुम्हाला जर म्हातारपणात मुलाने आधार द्यावा आणि शेवटपर्यंत आपल्याला त्याने साथ द्यावी असे जर वाटत असेल तर पालकांनो आपले कर्तव्य आहे की, अगोदर आपल्या मुलांवर चांगल्या व स्वच्छ संस्काराची पेरणी करून त्याला आदर्श नागरिक घडवा, मग पहा तुमचा मुलगा तुमच्या पासून दूर कधीच जाणार नाही आणि या दुनियेतील लोकांसोबत कधीच वाईट व्यवहार करणार नाही माणसासारखे वागून व माणसासारखे वर्तन करून माणूस असल्याचे उत्तम उदाहरण जगाला दाखवून देईल. त्यासाठी फक्त गरज आहे ती पालकांनी मुलांना योग्य संस्कार देण्याची.

# माणसं माणुसकीची, मोठ्या कर्तृत्वाची...

आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळ्या व्यक्ती भेटतात. त्यांची भेट होण्याची कारणेसुद्धा वेगवेगळी असतात. भेटलेल्या या व्यक्ती वेगवेगळ्या स्वभावाच्या व चांगल्या-वाईट विचारांच्या असतात. भेटलेल्या व्यक्तींच्या संगतीत राहिल्याने त्यांचे स्वभाव, त्यांचे आचारविचार हळूहळू लक्षात येतात. माणसं भेटत जातात, कळत नकळतपणे खूप काही शिकवून जातात.काही माणसं खूप चांगली असतात, लगेच मनात घर करून बसतात आणि हळूच आपलीशी होऊन जातात.

काही माणसं मात्र वरवर कितीही चांगले वाटत असले, तरीही ते आतून खूप खुजे असतात. अशा व्यक्तींच्या वर्तनातून स्वभावातील अवगुण स्पष्ट दिसतात आणि आपण त्यांच्यापासून खूप दूर फेकले जातो; परंतु जी माणसं माणुसकीची असतात, स्वभावाने खरोखर चांगले असतात त्यांच्याशी मन जुळते, स्वभाव जुळतो आणि विचारांचा सुंदर ताळमेळ जमतो.

जन्माने मिळालेल्या रक्ताच्या नात्यांसोबत बालवयापासून मिळून मिसळून राहण्याच्या सवयींमुळे त्या सगळ्या नात्यांसोबत आपण सुखदुःखात सहज अडजेस्ट होतो. तशी सवयच आपल्याला जडते आणि नात्यांचे महत्त्व आपण वेळोवेळी ओळखतो, जाणतो. परंतु जीवनात भेटलेल्या इतर अनेक व्यक्तींपैकी फार थोडे लोक आपले सच्चे मित्र वाटतात. विद्यार्थिदशेत ज्या शिक्षकांनी आपल्याला जवळ घेऊन शिक्षणाचे, शिस्तीचे व जीवन जगण्याचे धडे दिलेले असतात ते आपण आपल्या हृदयाच्या कोपऱ्यात साठवून ठेवतो. अशा आदर्श व निर्व्यसनी शिक्षकांना




आपण कधीच विसरू शकत नाही.

माझे वडील निर्व्यसनी होते, आमचे शिक्षक निर्व्यसनी होते म्हणून आम्ही भावंडंसुद्धा निर्व्यसनी आहोत. आमच्या शिक्षकांचे अक्षर रेखीव व वळणदार होते. आमचे हस्ताक्षरही रेखीव व वळणदार आहे. खाण तशी माती या म्हणीप्रमाणे आम्ही निर्व्यसनी राहिलो. उच्चशिक्षित झालो. नात्यांचा ओलावा टिकवून ठेवला आहे. सुदैवाने मला माझ्या जीवनात माणुसकीची व मोठ्या कर्तृत्वाची काही माणसे भेटली. त्यांच्याकडून मला खूप चांगल्या गोष्टी शिकता आल्या. कालिदासराव देशपांडे हे थोर स्वातंत्र्यसेनानी होते. शेतकरी संघटनेचे सक्रिय कार्यकर्ते होते.

**बबन गुळवे**
**९७३०९३९७३२**

त्यांनी मनात आणले असते तर ते मोठेपणात रममाण होऊ शकले असते. पण त्यांचा तो मूळ स्वभाव नव्हता. ते नेहमी आमच्या वस्तीत येऊन आम्हाला शिक्षणाचे महत्त्व सांगायचे, अवांतर वाचन करायला सांगायचे, पुस्तके व ग्रंथ वाचायला सांगायचे. आमच्या उमरगा कोर्ट गावातील जातीयता त्यांच्या पुढाकाराने बंद झाली. दुसरी माणुसकीची व्यक्ती भेटली फत्तेपूरचे डिगंबर पाटील. त्यांनी त्यांच्या मुलाच्या लग्नात फक्त उच्चभ्रू व नामदार व्यक्तींना निमंत्रित करू शकले असते, पण त्यांनी या प्रथेला फाटा दिला आणि पंचक्रोशीतील सर्व जातीधर्मांच्या लोकांना मूळ लग्नपत्रिका देऊन निमंत्रण दिले. जिकडेतिकडे जातिभेद केला जायचा, अशा त्या काळात मुलाच्या लग्नात त्यांनी सर्व उपस्थित लोकांना एकाच पंक्तीत बसवून सुरूची भोजन दिले. ही गोष्ट समाजात समता व मानवता पेरणारी होती. ती घटना आम्हाला आजही डिगंबर पाटलांची आठवण करून देत राहते.

गोताळा गावाचे गणेशराव गुळवे गुरुजी हे शिस्तीचे व विद्यार्थिप्रिय शिक्षक. मनात आणले असते तर ते इतर शिक्षकांप्रमाणे चाकोरीबद्ध जीवन जगू शकले असते. परंतु त्यांचा तो पिंड नव्हताच मुळी. शिक्षकाची नोकरी करत त्यांनी पंचक्रोशीतील गावांमध्ये विकासाची अनेक कामे केली. तळागाळातील मुलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले. कोणत्याही जातीधर्माच्या जनसमुदायावर कोणी अन्याय-अत्याचार करणार नाही, याची खबरदारी घेतली. माणुसकीचे जतन व संवर्धन करणारे कर्तृत्ववान माणसं आजकाल शोधले तरीही सापडत नाहीत. अशा माणसांची समाजाला आजही नितांत गरज आहे. पण जिकडेतिकडे स्वार्थी लोकांचा स्वैराचार वाढला आहे. समाजासाठी फुकट सेवा कोणी करत नाही. समाजकार्याच्या नावाखाली स्वार्थ कसा साधला जाईल, हे बघितले जात आहे. एकमेकांची मदत करणे आता बंद होऊ लागले आहे.

# हिवाळ्यावर एक दृष्टिक्षेप

**उन्हाळा, पावसाळा, हिवाळा**
**ऋतुचक्र फिरे ते वर्षकाळा**
**परी बरवा तो ऋतु हिवाळा!**

असे म्हटल्यास ते फारसे चुकीचे ठरणार नाही. कारण या काळात सृष्टीचे दिसणारे विलोभनीय रूप व आल्हाददायक वातावरण मनाला भावत असते, भुरळ घालत असते.

आश्विन महिना सरत आला की, वातावरणात परिवर्तन होण्यास हळूहळू सुरुवात होते. शेवटीशेवटी त्रस्त करणारा, नकोनकोसा वाटणारा पाऊस माघारी वळण्यास सुरुवात होते. आश्विनचा शेवटचा उत्तरार्ध व कार्तिकाच्या प्रारंभी हवेत गारवा जाणवू लागतो. हिवाळा ऋतु दारी उभा राहतो. पहाटे गारवा, दुपारी गरम असे काहीसे संमिश्र वातावरण तयार होते. चोरपावलांनी कळत नकळत थंडीचा शिरकाव होतो. नुकतीच दिवाळी संपली असल्याने तिची मोहिनी मनावर असतेच.

मार्गशीर्ष महिन्यात हा शिशिर ऋतू चांगलाच बहरतो व जवळपास सर्वत्र हिवाळा ऋतूचे राज्य सृष्टीवर पूर्णतः सुरू होते.

ओलसर पावसाळा, दाहक उन्हाळा यापेक्षा गोड गुलाबी थंडीचा हिवाळा ऋतू हा केव्हाही सुखदायक,प्रसन्नचित्त,विलोभनीय, मनमोहक असा जाणवतो. कारण यावेळी निसर्ग कात टाकत असतो. सृष्टिरंग बहरत असतात, सर्वांगाने खुलत असतात. हवेच्या शीतलहरी या वातावरणात पसरून थंडीची लाट येते. या गारव्याची मनाला कळत नकळत भुरळ पडते. थंडीने हुडहुडी भरल्यावर एरवी नको नको वाटणारे ऊन हवेहवेसे वाटते. ज्याला त्याला कोवळ्या ऊन्हाचा संग जडतो. थंडीचा तडाखा सहन होत नसल्याने ते टाळून सकाळचे कोवळे, लुसलुशीत, उबदार ऊन अंगावर घेण्यासाठी जो तो विलक्षण आतुर होतो. उत्सुक असतो. गरम उबदार कपड्यांचा जामानिमा अंगावर चढला गेल्याने त्याची गरमाई तनमनास सुखावते. हिवाळ्यात दिवस छोटा होत जातो व संध्याकाळी सहालाच दिवस मावळतीला जाऊन लवकरच अंधार पडू लागतो. सर्वत्र थंडीचा माहोल निर्माण होऊन ज्याला

**विजय भदाणे**

त्याला आपल्या उबदार घरकुलाची ओढ निर्माण होत असते. सर्वत्र थंडीचा कडाका, रात्रीचे सुनसान, निरव, निस्तब्ध शांत वातावरण, बहुतांशी थंडावलेली वर्दळ असे मनोरम चित्र तयार होते. पहाटेचे शीतल वारे आसमंत कवेत घेणारे, धुक्याचे दाट आवरण, पानाफुलांतून होणारा दवबिंदूंचा अभिषेक, आकाशाच्या बदलत्या छटा, बदलणारे रंग निसर्गाच्या मनोहारी व नेत्र सुखद आविष्काराने चित्तवृत्ती प्रसन्न होतात. यापूर्वीच्या वर्षा ऋतुत पाऊस समाधानकारक पडला असेल तर त्या पार्श्वभूमीवर निसर्गसौंदर्याला अधिक झळाळी प्राप्त होते.

पाण्याने भरलेले प्रवाह विहिरी-तलाव-सरोवरे-खळखळत वाहणाऱ्या नद्या, खट्याळ निर्झर मन लुभावत असतात. त्याचप्रमाणे हरित शेतशिवार, वृक्षराजी, जंगल-राने, विविध चवींची, रंग-रूपांची फळफळावळ, फुलांची, हिरव्या भाजीपाल्याची सृष्टी, ही शेतमाउलीची,अन्नपूर्णेची संपन्नता, समृद्धता मनाला संतुष्ट करून आनंदित करत असते. यावेळी ऊस, बोरे, वाटाणा, आवळा, हरभरा, संत्री, मोसंबी अशी फळफळावळे, ताजा टवटवीत भाजीपाला, असा गावरान मेवा हा क्षुधाशांती करतो, तसेच सुका मेवा काजू, बदाम, खारीक, खोबरे, साजूक तुपातले डिंक लाडू या पौष्टिक पदार्थांच्या सेवनाने खवय्यांची चांगलीच चंगळ होते. शाकाहारीप्रमाणेच मांसाहारीदेखील आघाडीवर असतात. दसरा, दिवाळी हे सण आनंदात पार पाडल्यानंतर येणारे देव दिवाळी, चंपाषष्ठी, दत्तजयंती, ख्रिसमस, मकर संक्रांत याप्रकारचे उत्साहवर्धक, आनंददायी सण यादरम्यान आल्याने जीवनाची रंगत अधिक वाढते. जुनी पाने गळून त्या जागी येणारी नवीन पालवी ही तर पुनरपी जनन! पुनरपी मरणं हे वैश्विक सत्य हिवाळा ऋतू सिद्ध करून जात असतो. हिवाळा हा व्यायामप्रेमींचा वार्षिक महोत्सवच! बराचसा आव्हानात्मक, खुपसा उल्हासवर्धक असतो. म्हणून एरवी व्यायामाचा सराव नसलेली मंडळीदेखील पहाटे उठून फिरणे, धावणे, व्यायाम करणे यात आनंद समाधान मानतात. हौशी पर्यटक निसर्गरम्य ठिकाणी जाऊन आनंद लुटण्याची, प्रवास करण्याची, नवीन पर्यटनथळे बघण्याची अशी पर्यटन पर्वणीच प्राप्त होत असते.

तुळशीच्या लग्नानंतर विवाह सोहळे थंडीची पर्वा न करता धूमधडाक्यात होऊ लागतात. शिक्षण संस्थांचे स्नेहसंमेलन उत्साहवर्धक वातावरणात साजरे होऊन जीवनात रंगत आणतात. जीवनाचे जवळपास सर्वच रंग दर्शविणारा हिवाळा ऋतू हा कितीही मजेशीर, परिपूर्ण असला तरी मात्र नाजूक प्रकृतीची, थंडी सहन न होणारी माणसं मात्र आग लागो त्या थंडीला! अशी दूषणं मात्र देत असतात. शेवटी व्यक्ती तितक्या प्रवृत्ती हे खरेच!

एकंदरीतच
ऋतु हिवाळा मौजमजेचा,
गारव्यात हरवून जाण्याचा,
सृष्टीचा हिमोत्सव अनुभवण्याचा,
शीतलतेचा आनंद लुटण्याचा,
हे बऱ्याच अंशी खरे!

# वऱ्हाडरत्न साहित्यिक : डॉ. मिर्झा रफी बेग

राज्याचे सुप्रसिद्ध साहित्यिक, कवी, मिर्झा एक्स्प्रेसफेम, हास्यसम्राट डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांच्या निधनाने साहित्यविश्वावर व रसिकांवर शोककळा पसरली. यवतमाळ जिल्ह्यातील नेर परसोपंत तालुक्यातील धनज माणिकवाडा हे त्यांचे मूळ गाव होते. वऱ्हाडी बोलीभाषेला लोकमंचावर नेणारे मोजक्या साहित्यिकांपैकी डॉ. मिर्झा बेग अग्रणी होत. अस्सल वऱ्हाडी बोलीतून खुमासदार सादरीकरण करण्याची शैली हेच त्यांचे वैशिष्ट्य होय. किशोरास्थेत डॉ. बेग काव्यलेखनाकडे वळले. साधारणतः सत्तरच्या दशकात आपल्या वऱ्हाडी काव्यरचना लोकमंचावर त्यांनी सादर करण्यास प्रारंभ केला.

डॉ. बेग यांनी प्रारंभी महाराष्ट्रातील अग्रणी वर्तमानपत्रांत काव्यलेखनास प्रारंभ केला. मिर्झाजी कहीन, हाय राणी, जांगडबुत्ता, मिर्झा एक्स्प्रेस या शीर्षकांखाली ते वऱ्हाडी बोली भाषेतून स्तंभलेखन करायचे. हे स्तंभलेखन तुफान लोकप्रिय ठरले. देशाच्या राजधानी दिल्लीपासून, तर आर्थिक राजधानी मुंबईपर्यंत; आपल्या मायबोली वऱ्हाडी भाषेतून काव्यरचना करून लोकमंचावर सादर करण्याच्या तऱ्हेने ते गल्लीपासून दिल्लीपर्यंत सुप्रसिद्ध झाले. जांगडबुत्ता या वऱ्हाडी शब्दाचे जनक म्हणून त्यांच्याकडे बघितले जाते. ग्रामीण भागातील समस्या, सामाजिक विषमता, बेरोजगारी, शेतकरी-शेतमजुरांच्या व्यथा, शेती, माती, संस्कृती आणि समाजजागृती हा त्यांच्या काव्यलेखनाचा केंद्रबिंदू होता. विनोदीशैलीतून काव्यलेखनासोबतच त्यांचे काव्य मार्मिक, तार्किक आणि अंतर्मुख करणारे होते. त्यांनी आजपावतो वीसहून अधिक काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. इरवा हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह होय. सगुना, मुगुट हे त्यांचे काव्यसंग्रह होय. गोंदण हा काव्यसंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर होता. मिर्झा एक्स्प्रेस या नावाने वर्तमानपत्रात वऱ्हाडी लेखन करून सदर लिहायचे. या सदराच्या लोकप्रियतेनंतर लोकमंचावर मिर्झा एक्स्प्रेस हा एकपात्री विनोदी प्रयोग सादर करत असत. महाराष्ट्रात सहा हजारांहून अधिक प्रयोग झाले आहेत. या एकपात्री प्रयोगाने वऱ्हाडात ते मिर्झा एक्स्प्रेस म्हणून ओळखले जातात.

सातवा महिना...उठ आता गणपत...आणि जांगडबुत्ता यांसारख्या त्यांच्या वऱ्हाडी काव्यरचनेला रसिकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत होता आणि त्या रचना लोकप्रिय ठरल्या. महाराष्ट्रातील साहित्यविश्वात त्यांनी अनेक मानाचे स्थान भूषविले आहे. ६४ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्षही ते राहिले. पंधरा वर्षांपूर्वी एका दूरचित्रवाणीवर हास्यसम्राट हा विनोदी प्रायोजित कार्यक्रम प्रसारित व्हायचा. त्यात ते झळकले आणि संपूर्ण महाराष्ट्रात डॉ. मिर्झा बेग हास्यसम्राट म्हणून प्रसिद्धीच्या झोतात आले. अनेक दशके महाराष्ट्रातील जनतेला काव्यकलेच्या माध्यमातून खळखळून हसविणारे हरहुन्नरी साहित्यिक, वऱ्हाडरत्न डॉ. बेग यांना काळाने हिरावून घेतले. त्यांना भावपूर्ण आदरांजली!

**- शशिकांत तोटे, दारव्हा**

# सिंहस्थ कुंभमेळ्याबाबत वादग्रस्त विधान करणाऱ्या टकलेंवर गुन्हा दाखल करा!

**जनमनाचे प्रतिध्वनी**

हिंदू धर्मावर, प्रथा-परंपरांवर, साधू-संतांवर व हिंदू संघटनांवर टीका करणारे पत्रकार निरंजन टकले यांनी नाशिकमध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याबाबत पुन्हा एकदा वादग्रस्त विधान केल्याने त्यांच्यावर चहूबाजूंनी टीका होताना दिसते. सिंहस्थात येणारे साधू-संत गांजा पितात आणि सर्वत्र दुर्गंध पसरवतात, या त्यांच्या विधानामुळे हिंदूंच्या भावना दुखावल्या आहेत. कुंभमेळा हा केवळ महाराष्ट्रातील नव्हे, तर जगभरातील हिंदूंसाठी व साधू-संतांसाठी श्रद्धेचा विषय आहे. सश्रद्ध भाविकांच्या श्रद्धा त्याच्याशी जोडल्या गेल्या आहेत. गंगेसम पवित्र असलेल्या गोदावरी नदीत स्नान करण्यासाठी सिंहस्थाच्या निमित्ताने लाखो भाविक नाशिकनगरीत येतात. गतवर्षी प्रयागराज येथे झालेल्या कुंभमेळ्याचे नाव जागतिक विक्रमात नोंदले गेले. कोणत्याही निमंत्रणाशिवाय भरणाऱ्या भक्तीच्या महासागराला अमूर्त सांस्कृतिक वारसा म्हणून युनेस्कोकडूनही कुंभमेळ्याला मान्यता मिळाली आहे. असे असताना हिंदूंच्या भावना दुखावण्याचे वक्तव्य करून टकले यांनी हिंदू धर्माला बदनाम करण्याचा, हिंदूंमध्ये बुद्धिभेद करण्याचा, त्यांच्यात फूट पाडण्याचा व सामाजिक शांतता भंग करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे क्यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करावी, अशी मागणी हिंदुत्वनिष्ठांनी केली आहे.

**- जगन घाणेकर, घाटकोपर**

गांवकरी®
('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह)

'गांवकरी प्रकाशन'च्या मालकीचे हे दैनिक छत्रपती संभाजीनगर आवृत्तीचे परवानाधारक आय.ए. व्हिजन प्रा.लि. यांचे वतीने कैलास टॉवर्स, प्लॉट क्र.१,सौजन्यनगर, काल्डा कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ येथून प्रकाशित करण्यात आले.
कार्यकारी संपादक : दिनेश राधाकृष्ण हारे* (*पीआरबी कायद्याप्रमाणे प्रकाशित मजकूरास जबाबदार) प्रकाशक : दिनेश हारे
मुद्रक : कुलभुषणराम तारे, (सोलापूर तरूण भारत मीडिया लि.,) प्लॉट नं. ए-३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को. ऑप. सो., रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ (महाराष्ट्र)

## संक्षिप्त बातम्या

### मतमोजणी केंद्र परिसरात प्रतिबंधीत आदेश

**नांदेड :** जिल्ह्यातील नगरपरिषद/नगरपंचायत बिलोली, देगलुर, धर्माबाद, हदगाव, हिमायतनगर, कंधार, कुंडलवाडी, मुदखेड, मुखेड, उमरी, भोकर, किनवट, लोहा निवडणूक मुख्यालयी मतमोजणी केंद्र परिसरात बुधवार ३ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणी केंद्रापासून २०० मीटर परिसरातील सर्व पक्षकारांचे मंडपे, सर्व दुकाने, मोबाईल, कॉडलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, निवडणुकीच्या कामाव्यतीरिक्त खाजगी वाहन, संबंधीत पक्षाचे चिन्हांचे प्रदर्शन व निवडणूकीच्या कामाव्यतीरीक्त व्यक्तीस प्रवेशास प्रतिबंधीत करण्यात येत आहे. याबाबतचा आदेश भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये जिल्हादंडाधिकारी राहूल कर्डिले यांनी निर्गमीत केला आहे. हा आदेश नांदेड जिल्ह्यातील नप/नपं-बिलोली, देगलुर, धर्माबाद, हदगाव, हिमायतनगर, कंधार, कुंडलवाडी, मुदखेड, मुखेड, उमरी, भोकर, किनवट, लोहा निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने मतमोजणीच्या दिवशी बुधवार ३ डिसेंबर२०२५ रोजी सकाळी ६ वाजेपासून ते मतमोजणी प्रक्रिया संपेपर्यन्त अंमलात राहणार आहे.

### महाविहार परिवाराकडून महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन



**नांदेड :** स्त्री शिक्षणाचे जनक, सत्यशोधक चळवळीचे निर्माते, शिक्षणाचे महत्त्व बहुजन समाजाला सांगून त्यांच्यासाठी शाळा स्थापन करणारे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १३५ व्या स्मृतिदिनानिमित्त महाविहार परिवाराच्या वतीने शहरातील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. महाविहार परिवार ही सामाजिक संघटना बुद्ध वधू वर परिचय मेळावा घेणे, बुद्ध विहामध्ये दर रविवारी बुद्ध वंदना घेणे आदी सामाजिक उपक्रम राबवत समाजामध्ये महापुरुषांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करत असते. त्याचप्रमाणे शुक्रवार २८ नोव्हेंबर हा महात्मा ज्योतिबा फुले यांचा १३५ वा स्मृतिदिन असल्याने महाविहार परिवाराचे सर्व सदस्यांनी शहरातील महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी महाविहार परिवाराचे संयोजक यशवंतराव गच्चे, ड.भीमराव हाटकर, हिरामण वाघमारे, शुद्धोधन जोंधळे, साहेबराव पुंडगे, मधुकर जोंधळे, सूर्यवंशी दाभडकर,रमेश दुधवल, गौतम खिराडे, जनार्धन आठवले, भैय्यासाहेब गोडबोले, राहुल कोकरे आदींची उपस्थिती होती.

### भारतीय संविधानाचा अमृत उत्साहात साजर



**नांदेड :** भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा नांदेड उत्तरच्या वतीने दि. २६ नोव्हेंबर संविधान दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे दिपाने व पुष्पाने पूजन करून उपस्थित जिल्हा शाखा शहर शाखा,तालुका शाखा,वार्ड शाखांचे पदाधिकारी यांनी अभिवादन केले. त्यानंतर त्रिशरण पंचशील ग्रहण करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.त्यानंतर संविधान उद्देशिकेचे सामुदायिक वाचन करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेचे नांदेड जिल्हा सरचिटणीस दामोधर सरकटे होते तर जिल्हा पदाधिकारी कॅप्टन सुरेश गजभारे,सुभाष नरवाडे,ईश्वर जोंधळे, जिल्हा संघटक पत्रकार उद्धवराव सरोदे यांची प्रमुख उपस्थिती होती.सैनिक शेषेराव वाघमारे,सदाशिव हनुमंते,जिल्हा पदाधिकारी शहर संरक्षण उपाध्यक्ष यशवंत ढगे,कृष्णा गजभारे डिव्हिजनल ऑफिसर तथा जिल्हा संस्कार सचिव,प्रकाश सोंडारे शहर सचिव,विश्वनाथ चौदंते वार्ड अध्यक्ष भीमघाट,मेजर जनरल सुरेश गजभारे जिल्हा संरक्षण उपाध्यक्ष, ईश्वर जोंधळे आदिंनी मनोगत व्यक्त केले.सुभाष नरवाडे यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन करून सर्वांना शुभेच्छा दिल्या आणि कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जिल्हा कार्यालयीन सचिव स.ना.भालेराव यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार जिल्हा पर्यटन सचिव जनार्दन जमदाडे यांनी मानले.शेवटी सरणंत्तय गाथा घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.याप्रसंगी महिला जिल्हाध्यक्ष रेखाताई पंडित,जिल्हा कोषाध्यक्ष कांबळे ताई,मेजर कर्नल आनंद झडते,उद्धवराव सरोदे जिल्हा पदाधिकारी रामराव कदम,शहर कोषाध्यक्ष व शहर शाखा,तालुका शाखा,वार्ड शाखेचे पदाधिकारी,समता सैनिक दलाचे सैनिक व बौद्ध उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कै.गयाबाई बोकारे यांचे निधन



**नांदेड :** कै.गयाबाई लक्ष्मणराव बोकारे, यांचे वृद्धापकाळाने ९२ व्या वर्षी,दि. २९ नोव्हेंबर २५ शनिवार रोजी १० वाजता दुःखद निधन झाले आहे. मुकुंद बोकारे (विभागीय मार्गदर्शक – जूक्टा संघटना ) यांच्या मातोश्री व श्रीमती ललिता बोकारे शिंदे ( मा. महिला व बालविकास सभापती, नांदेड ) यांच्या सासूबाई होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, १६ नातवंडे, २० परनातू असा मोठा परिवार आहे. अंत्यविधी शनिवारी दुपारी ४ वाजता मार्कंड ता. जि. नांदेड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# खा. अशोक चव्हाण पैसे वाटून बारामती नाही तर लोकांवर भानामती करतात –आ. पाटील

नांदेड /प्रतिनिधी



मुदखेड शहराचा विकास करण्यासाठी एकदा चॉन्स द्या, एकदा चॉन्स असे म्हणत केंद्रिय गृहमंत्री पदासह मुख्यमंत्री, राज्यसभा खासदार, आमदार अशी अनेक पदे आपल्या घरात ठेवत सत्ता भोगत आहे. आता मुदखेड शहराला बारामती करतो, अशा भुलथापा भाजप खा. अशोकराव लोकांना देत आहेत. परंतू बारामती नव्हे तर खा. अशोकराव पैसे वाटून लोकांवर भानामती करतात, अशी जोरदार टीका शिवसेनेचे आमदार हेमंत पाटील यांनी केली.

एकेकाळी अंत्यत सलोख्याचे संबंध असणाऱ्या भाजप खा. अशोकराव चव्हाण व शिंदे शिवसेनेचे विधान परिषद आ. हेमंत पाटील यांच्यात मागील का ही महिन्यापासून शाब्दीक चकमक उडत आहे. आ. पाटील यांच्याकडून तर अशोकरावांनवर घणाघाती शाब्दीक हल्ला केला जात आहे. आता जिल्हयात होत असलेल्या नगर परिषदा व नगरपंचायत निवडणुकीच्या अनुषंगाने या दोन नेत्यांमधील शाब्दीक हल्ला आणि वाद विकोपाला गेला आहे. राज्यात सत्तेमध्ये महायुती म्हणून भाजप शिसवेना सहभागी आहे परंतू स्थानिक निवडणुकीत भाजप, शिवसेना स्वतंत्र लढत आहेत. प्रचाराला अवघे २ दिवस उरले आहेत. यामुळे नेत्यांच्या सभा गाजत आहेत. खा.चव्हाण यांचा मतदार संघ असलेल्या मुदखेड शहरात भाजपची नुकतीच सभा झाला. या ठिकाणी बोलतांना खा. अशोकराव यांनी एकदा चॉन्स द्या, मुदखेडला बारामती करून दाखवतो, असे विधान केले, याच विधानावरून हेमंत आ. पाटल यांनी खा. अशोकरावांवर जोरदार टीका केली. ते म्हणाले एकदा चॉन्स द्या, एकदा चॉन्स असे म्हणत केंद्रिय गृहमंत्री पदासह मुख्यमंत्री, राज्यसभा खासदार, आमदार अशी अनेक पदे आपल्या घरात ठेवत सत्ता भोगत आहेत. आता मुदखेड शहराला बारामती करतो, अशा भुलथापा देत आहेत. परंतू बारामती नव्हे तर ते पैसे वाटून लोकांवर भानामती करतात, अशी खोचक टीका त्यांनी केली. शिवसेनेच्या मुदखेड येथील


सभेत ते बोलत होते. एक, एक चॉन्स म्हणत ७२ वर्ष चव्हाण कुंटूबियांनी सत्ता भोगली, आता किती वर्ष तुम्हाला चॉन्स द्यावा. आम्ही तर जनता जर्नाधनामुळे आमदार झालो. मात्र तुम्हाला दोन वेळा मुख्यमंत्री करूनही विकास झाला नाही. मग आता काय करणार, असा सवाल उपस्थित केला.

तर पुढे आ. हेमंत पाटील म्हणाले, खा, अशोक चव्हाण हे सॅटर्डे संडे नेते आहेत. आठ, पंधरा दिवसाला नादेंडात येतात.

नारळ फोडतात, एखादी पत्र परिपद, सभा वैगेरे घेतात अन् परत जातात. मागील वांधकाम मंत्री पदाच्या काळात ८५०० कोटीची कामे केली म्हणतात. मात्र चौकशी लागयची म्हटले की, दुसऱ्या पक्षात जातात. माग चौक शी कशी होईल. या निधीमधून केवळी चार, पाच बगलवच्चे गुत्तेदारांचा विकास मात्र झाला. तर आताच्या निवडणुकीत तुमच्वाचं योजनांच्या पैशाचे पोलिस बंदोवस्तामधील वाहनातून वाटत होईल असा आरोप करत हा पैसा काय त्यांनी नांगर मारून आणला नाही, अशी टीका ही आ. पाटील यांनी केली.

## आज नांदेडात महाकवी वामनदादा कर्डक जयंती महोत्सव

नांदेड /प्रतिनिधी



अखिल भारतीय आंबेडकर महासभा या सामाजिक संघटनेच्या वतीने आज नांदेड महाकवी वामनदादा कर्डक जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याचे संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रावण नरवाडे व युवा जिल्हाध्यक्ष दीपक साळवे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

सदरील कार्यक्रम हा पीपल्स कॉलेज नांदेडच्या नरहर कुरुंदकर सभागृहात रविवार दिनांक ३० नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी दोन ते पाच या वेळेत होणार आहे. या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष भीमशाहीर ललकारबाबू वानखेडे, निमंत्रक समता सैनिक दलाचे जिल्हा मेजर सुरेश गजभारे,, अध्यक्षस्थानी साहित्यिक राज गोडबोले,उद्घाटक म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व्यंकटराव दुधंबे तर प्रमुख अतिथी म्हणून ,ऍड.भीमराव हाटकर,नामदेव दिपके,धनंजय बेलोकर यांची उपस्थिती राहणार आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना बहुजन रत्न हा पुरस्कार देण्यात येणार आहे. यात सिद्धार्थ तलवारे,मिलिंद यंगडे,बबीता पोटफोडे, भगवान गायकवाड,अशोक हिंगोले, यशोदाबाई कदम(महाबळे), शेरसिंह राणा (अलाहाबाद ),उपासना बांगड हैदराबाद( आंबेडकरी चळवळ ), सदाशिव गच्चे, मिलिंद दिवेकर, महादेव उपे, जयभीम पाटील(पत्रकारिता ), नागोराव वैद्य, तुषार वडणे (कला )इंजि. संघरत्न सोनसळे, इंजि. भरत कानिदे, खंदारे दीपक, रवी सरोदे , धाकडे सर,आनंद जोंधळे, आनंद (बंटी )लांडगे,हिवाळे साहेब,केशव वाघमारे,प्रकाश नवरे,अनिल कांबळे, शीतल नरवाडे, भुजंग वाघमारे, सुभाष खाडे, ऋषिकेश भद्रे (समाजसेवा ), राहुल भिसे ( उद्योग), कॉ. गंगाधर गायकवाड ( कामगार चळवळ ) यांचा समावेश आहे. पुरस्काराचे स्वरूप शाल,,पुष्पहार, मानपत्र व सन्मान चिन्ह असे आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय टिके, अनिता गोडबोले,शुद्धोधन पाईकराव, कोकरे भुजंग,विजय डोईबळे रोहिदास डांगे,यशवंत जोंधळे, महेंद्र सोनकांबळे,सुभाष लोखंडे, कांबळे, धम्मा वानखेडे, गौतम थोरात हे प्रयत्नशील आहेत.

## विद्यापीठातील नाट्य विभागाने जिंकली प्रेक्षकांची मने

### थिएटर हाऊसफुल्ल, तो ती मनोहर नाटकाला प्रचंड प्रतिसाद

नांदेड/ प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित ६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी नुकतीच शहरातील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात पार पडली. दि.१६ नोव्हेंबरला सुरुवात झालेल्या या स्पर्धेची सांगता दि.२७ नोव्हेंबर रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या ललित व प्रयोगजीवी कला संकुलातील नाट्य व चित्रपट विभागाच्या विद्यार्थ्यांच्या नाटकाने झाली. विद्यार्थी लेखक व दिग्दर्शक अतुल साळवे यांच्या तो ती आणि मनोहर या नाटकाला नांदेडच्या नाट्यरसिकांनी उदंड प्रतिसाद दिला. अक्षरशः शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह हाऊसफुल्ल झाले. बसायला जागा कमी पडत असतानाही काही प्रेक्षकत हे पायऱ्यावर तर काही उभे राहून नाट्यानुभव घेत असल्याचे चित्र यावेळी बघायला मिळाले. नाटकातील उत्कट प्रसंगांना, संवादाला, अभिनयाला नांदेडच्या नाट्यरसिकांनी भरभरुन दाद दिली. विद्यापीठातील नाट्य व चित्रपट विभागातील एम. ए. नाट्यशास्त्र अभ्यासक्रमातील प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी संचालक डॉ पृथ्वीराज तौर व नाट्य व चित्रपट विभागाचे प्रा. राहुल जयप्रकाश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या नाटकाची निर्मिती केली आहे.

यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरु डॉ अशोक महाजन, कुलसचिव डॉ डी.डी.पवार, संचालक डॉ पृथ्वीराज तौर, डॉ. पी. विठ्ठल व विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीही नाटकाला उपस्थित राहुन विद्यार्थी कलावंतांचा उत्साह वाढवला. विजय गजभारे, सपना वाघमारे, मानसी बेलापुरकर, राहुल मोरे, चंद्रकांत तोरणे, करन गुडेवार यांनी आपल्या कसदार अभिनयाने प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवले. तो ती मनोहर या नाटकाचे लेखन-दिग्दर्शन- विद्यार्थी अतुल साळवे यांनी केले, तर निर्मीती प्रमुखाची जबाबदारी नाट्य विभागातील प्रा. राहुल गायकवाड यांनी सांभाळली. या नाटकाची प्रकाश योजना - माणिकचंद थोरात, रंगभूषा - सौ द्वारका साळवे, वेशभूषा- कांचन वसेकर, नेपथ्य- राहुल गायकवाड व संगीत अतुल साळवे यांनी केले, तर मंच व्यवस्थापनाची जबाबदारी नागेश सोनकांबळे, रोहन पंडित, अमित सोनकांबळे, निलेश गच्चे, अजिंक्य जाधव, सुनिल ममदापुरे, सचिन थोटे, सुमित सोळंके, गजेस्विनी देलमाडे यांनी पार पाडली.

## भ्रष्टाचारमुक्त कारभारासाठी एक संधी द्यावी – किन्हाळकर

### भोकर नगरपरिषद निवडणुकीत सर्वच पक्षांनी प्रचारात जोर धरला!

नांदेड/प्रतिनिधी



भोकर नगरपरिषद निवडणुकीत आता चांगलाच रंग भरला असून प्रचाराचे शेवटचे दोन दिवस उरलेले असताना कॉंग्रेस, भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी, वंचित आणि एमआयएम या सर्वच पक्षाने जोर लावला आहे. अगोदर भाजपा व कॉंग्रेस अशी असणारी लढत आता सुभाषराव किन्हाळकर यांच्या उमेदवारीने 'तिरंगी' झाली आहे. मागच्या दहा वर्षात नगरपरिषदेत झालेल्या भ्रष्टाचाराचा मुद्दा पुढे करत सुभाष किन्हाळकर किन्हाळकर यांनी भ्रष्टाचार मुक्त नगर परिषदेच्या कारभारासाठी निवडून द्यावे अशी साद मतदारांना घातली आहे. भोकर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी भाजपकडून भगवान दंडवे, शिवसेनेकडून सुभाष किन्हाळकर, कॉंग्रेसकडून संदीप गौड, राष्ट्रवादीकडून नागनाथ घिसेवाड, एम आय एम कडून मुनीब खान यांनी प्रचारात आता चांगला जोर वाढवलेला दिसून येतो. खा. अशोक चव्हाण, खा. रवींद्र चव्हाण, आ. हेमंत पाटील, आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनी आपापल्या पक्षाच्या उमेदवारामागे मोठी ताकद उभी केली असून तालुक्याच्या बाहेरील राजकीय कार्यकर्ते आता भोकर शहरात प्रचारासाठी उतरले आहेत. सर्वच पक्षाने आपापले जाहीरनामे आता जाहीर केले असून सुभाष किन्हाळकर यांनी अभिवचननामा सादर करीत भ्रष्टाचार मुक्त कारभारासाठी नगराध्यक्षपदी निवडून द्यावे अशी साद त्यांनी भोकरवासीयांना घातलेली आहे. शिवसेना पक्षाच्या वतीने दिलेल्या अभिवचननाम्यात शहरात स्वातंत्र्य सैनिकाचे व विविध राष्ट्रपुरुषांचे स्मारक उभा करणे, अवाजवी करातून नागरिकांची मुक्तता करणे, गुंठेवारीतील आर्थिक गैरव्यवहारांचे उच्चाटन करणे, बांधकाम परवाना देताना होणारा गैर आर्थिक व्यवहार थांबवणे, फेरफार व प्रॉपर्टी नोंदी करतांना होणाऱ्या भ्रष्टाचारावर पूर्णविराम लावणे, जनतेसाठी स्वस्त घरे, जिथे जनहित नाही तिथे जमिनीवर आरक्षण टाकण्यात येणार नाही, शुद्ध पाणीपुरवठा, स्वच्छ, सुंदर व रहदारीमुक्त शहर निर्मिती आणि युवक व महिलांसाठी कौशल्य विकास केंद्राची निर्मिती शहरात करण्यात येईल इत्यादी ठोस आश्वासने जाहीर केली असून जनतेच्या समस्यासाठी दर महिन्याला जनता दरबार सुद्धा भरवण्यात येईल, असे सुभाष किन्हाळकर यांनी स्पष्ट केले आहे. तसेच कॉंग्रेस, राष्ट्रवादी, भाजपा व इतर पक्षांनीही आपले जाहीरनामे प्रकाशित करत नगरपालिकेत विजयी करण्याचे आवाहन केले आहे.

## रमाई आंबेडकर बुद्ध विहारात आज समता सैनिक दलाची नाव नोंदणी

नांदेड /प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा शहर शाखा नांदेड उत्तर च्या वतीने माता रमाई आंबेडकर बुद्ध विहार सहयोग नगर नांदेड येथे आज समता सैनिक दलामध्ये भरती पूर्व नावं नोंदणी अभियान कार्यक्रम आज ३० नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आला असून यावेळी भारतीय बौद्ध महासभा महाराष्ट्र राज्याचे संरक्षण सचिव अमरसिंग ढाका आणि प्रा.राजेश ढवळे मार्गदर्शन करणार आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायाच्या आधारावर समाजाची स्थापना होण्यासाठी तरुणांना शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम बनवून त्यांचा सर्वांगीण विकासासाठी योग्य प्रशिक्षण देऊन निर्व्यसनी,निर्भय पिढी घडविण्यासाठी समता सैनिक दलामध्ये सामील व्हावे आणि नांदेड नगरीतील सर्व बौद्ध उपासक, उपासीका आणि युवावर्गाने मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ईश्वर जोंधळे हे उपस्थित राहणार असून पूज्य भिक्खु शिलरत्न थेरो आणि चंद्रकांत घोडगे हे बुद्ध पूजापाठ घेणार आहेत. कार्यक्रमासाठी गणपतराव गायकवाड, सुभाष नरवाडे,रवीकिरण जोंधळे, सुरेश गजभारे, इंजी. यशवंत गच्चे, अनिता कंधारे, कीर्तीताई गायकवाड, राजेश बिऱ्हाडे, देवराव झगडे,अशोक जोंधळे, पांडूरंग वाकळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भारतीय बौद्ध महासभा शहर शाखा नांदेड उत्तरचे रमेश कोकरे, सदाशिव हनुमंते, विजय पोपलवार, आनंद जोंधळे, राम कदम, प्रा. एस.डी. बडेराव, यशवंत ढगे, भिमराव कदम, निवृत्ती लोणे, दिगंबर ढगे, पंकज जोंधळे, प्रकाश जोंधळे, केशवराव वाघमारे, अशोक कदम,आणिल लोणे, सिद्धार्थ भालेराव,डी. एन. कांबळे, सुभाष लोखंडे, प्रकाश कदम आदी परिश्रम घेत आहेत.

## विद्यापीठात अन्वेषण संशोधन स्पर्धेचे भव्य आयोजन

### १३० विद्यार्थ्यांच्या संशोधन प्रकल्पांचे दमदार सादरीकरण

नांदेड/प्रतिनिधी



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे आयोजित विद्यापीठस्तरीय विद्यार्थी संशोधन अधिवेशन अन्वेषण २०२५-२६' चे मंगळवारी (२६ नोव्हेंबर) विद्यापीठ परिसरातील औषधनिर्माणशास्त्र संकुलात दिमाखात उद्घाटन करण्यात आले. कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते या अधिवेशनाचे उद्घाटन संपन्न झाले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, औषधनिर्माणशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. एस. एस. पेकमवार, तसेच डॉ. एच. एस. फडेवार, डॉ. वसंत वाघ, डॉ. बाबुराव जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

भारतीय विद्यापीठ संघाद्वारे देशभर राबविण्यात येणारा अन्वेषण' हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये संशोधन संस्कृती जोपासण्यासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरत असल्याचे मत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर व्यक्त केले. विद्यार्थ्यांची संशोधनवृत्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नवकल्पनाशक्ती बळकट करण्यासाठी हे व्यासपीठ महत्त्वपूर्ण असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

या अधिवेशनात कृषी, मूलभूत विज्ञान, अभियांत्रिकी-तंत्रज्ञान, आरोग्य व समृद्धी विज्ञान, फार्मसी, समाजशास्त्र, वाणिज्य-कायदा आणि आंतरशाखीय संशोधन अशा सहा प्रमुख विभागांतर्गत ७४ संशोधन प्रकल्पांचे प्रभावी सादरीकरण झाले. विद्यापीठाशी संलग्न विविध महाविद्यालये व संकुलांतील एकूण १३० विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.

स्पर्धेत सोफिया पठाण, अस्मिता इंगळे, स्वप्निल कांबळे, वैष्णवी हेसे, वैष्णवी मलेवाड, गौतम दूरगम, आदित्य मोदिराज, यश जाभुरकर, विशाल वाडेकर, दिगंबर आजल आणि गीतांजली आबादे यांनी सादर केलेल्या प्रकल्पांना प्रथम क्रमांकाचे मानांकन मिळाले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना आगामी वेस्ट झोन अन्वेषण' स्पर्धेत, सरदार वल्लभभाई पटेल विद्यापीठ, आनंद (गुजरात) येथे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. अधिवेशनाच्या यशस्वी नियोजन व अंमलबजावणीमध्ये संगणकशास्त्र आणि भूशास्त्र संकुलातील विद्यार्थ्यांसह डॉ. राजेश्वर क्षीरसागर आणि शंकर हंबर्डे यांचे विशेष सहकार्य लाभले.

## वहेगाव येथे दत्तात्रेय जन्मोत्सवाची जय्यत तयारी

# दत्त नाम सप्ताह, लाल कंधारी पशुप्रदर्शन, कुस्ती दंगल आदी भव्य कार्यक्रमांची मेजवानी

नांदेड/प्रतिनीधी

तालुक्यातील मोहनपुरा येथील दत्तात्रय भारती मठ येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दत्त जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असून दत्त नाम सप्ताह, दत्त महापुराण कथा,लाल कंधारी पशुप्रदर्शन, पालखी सोहळा, कुस्ती दंगल आदी भव्य कार्यक्रमांची मेजवानी भाविक भक्तांना दिली जाते या कार्यक्रमास तेलंगणा, आंध्रप्रदेश व महाराष्टातील महंत, संत शिष्यगण यांनी उपस्थित राहून या सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन रामभरती गुरू मारुती भारती महाराज यांनी केले आहे.

दत्तात्रय जन्मोत्सवानिमित्त अखंड दत्त नाम सप्ताह २७ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर पर्यंत चालणार असून यामध्ये प्रत्येक दिवशी सकाळी ८ वाजता दत्तमुर्ती गंगाजल अभिषेक, सकाळी ७ ते ९ बालक्रिडा ग्रंथाचे पारायण, दत्त जन्मोत्सव व महाप्रसाद दुपारी २ वाजता, सायं. ६ ते ९ वाजाता,आनंद सांप्रदाय किर्तन रात्री ९ ते ११ वा जोपर्यंत होणार असून गुरुवार २७ नोव्हेंबर रोजी रात्री ९ ते ११ दभप रुद्रगीर महाराज किवळेकर यांचे कीर्तन, शुक्रवार २८ नोव्हेंबर रोजी दभप शिवाजी महाराज शिंदे टाकळीकर, शनिवार २९ नोव्हेंबर रोजी हभप कृष्णा महाराज राजूरकर, रविवार ३० नोव्हेंबर रोजी दभप



रेखाताई सुरूशे यवतमाळ, सोमवार १ डिसेंबर रोजी दभप उर्मिलाताई जाधवर गोविंदपुर, मंगळवार २ डिसेंबर रोजी दभप सच्चिदानंद गुरु महाराज, बुधवार ३ डिसेंबर रोजी दभप प्रताप महाराज पिंपळकोठेकर यांचे कीर्तन होणार आहे.

गुरुवार ४ डिसेंबर महंत १००८ राम भारती गुरु मारुती भारती यांच्या हस्ते दत्तात्रय जन्मोत्सव संपन्न होणार असून सकाळी ११ ते दुपारी १ वाजता दत्त कथाकार दभप प्रताप महाराज पिंपळकोठेकर यांचे कीर्तन होणार आहे. सर्व भाविक भक्तांना महाप्रसाद राजू येवले जानापुरीकर यांच्याकडून देण्यात येणार आहे. या कार्यक्रमास मार्कंड, बेटसांगवी, भनगी, रहाटी, सोमेश्वर, जैतापूर,पिंपळगाव (नि),दगडगाव, गंगाबेट,विष्णुपुरी, कपिलेश्वर, बेटसांगवी, मोहनपुरा, कऱ्हाड आदी गावातील भजनी मंडळी सहभागी होणार आहेत.

दत्तात्रेय जन्मोत्सव निमित्त दुपारी २ वाजता महाप्रसाद सायंकाळी ५ ते १० वाजेपर्यंत महापूजा होणार आहे. शुक्रवार ५ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता पालखी मिरवणूक सोहळा, सकाळी ११ वाजता लाल कंधारी जनावरांचे पशुप्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. राजकुमार पडले यांच्या हस्ते होणार असून नांदेड पं. स.चे गटविकास अधिकारी पी.एम सुरडकर, पशु विकास अधिकारी डॉ. एस.पी.गिरी, वाहेगावच्या सरपंच मीनलताई सोनटक्के, ग्राम विकास अधिकारी एम. आय. यनावार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. शनिवार ६ डिसेंबर रोजी दुपारी १ वाजता जंगी कुस्ती दंगल चे उद्घाटन माजी आमदार राम पाटील रातोळीकर यांच्या हस्ते होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून नांदेड दक्षिणचे आ. आनंदराव पाटील बोंढारकर,शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, आनंद पाटील, लोहा पंचायत समितीचे माजी सभापती सतीश पाटील उमरेकर हे उपस्थित राहणार आहेत. तरी या सर्व कार्यक्रमांचा लाभ सर्व भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन महंत १००८ राम भारती महाराज यांनी केले आहे.

# जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगेंनी घेतला मतदान प्रक्रीयेचा आढावा

## स्ट्राँगरूमसह मतमोजणी केंद्राची केली पाहणी



**लातूर/प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी रेणापूर नगरपंचायत कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी रेणापूर येथील मतदान केंद्रांवरील सुविधांची पाहणी केली. तसेच स्ट्राँगरूम व मतमोजणी केंद्राची पाहणी केली. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी सर्वांनी आपल्यावर सोपविलेली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

तहसीलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी प्रशांत थोरात, नगरपालिका प्रशासनचे सहआयुक्त अजित डोके, मुख्याधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन भुजबळ, नायब तहसीलदार तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तानाजी यादव, गट विकास अधिकारी सुमित जाधव, गट शिक्षणाधिकारी कृष्णा भराडिया यांची प्रमुख उपस्थिती होती. मतदार जागृतीसाठी प्रशासनाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमाला जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी उपस्थिती लावली. शासकीय आयटीआय येथील स्ट्राँगरूम व मतमोजणी केंद्र परिसरातील सुरक्षा व्यवस्था, सीसीटीव्ही यंत्रणा आदी बाबींचा जिल्हाधिकारी यांनी यावेळी आढावा घेतला.

# आता ऊस आंदोलनाची व्याप्ती जिल्ह्याबाहेरही वाढली

## शेकडो शेतकऱ्यांचा फौजफाटा विविध कारखान्यावर धडकला



**परळी/प्रतिनिधी**

ऊस उत्पादक संयुक्त कृती समितीने पुकारलेल्या कोयता बंद, वाहतूक बंद आंदोलन करत असून या आंदोलनाची व्याप्ती जिल्ह्याबाहेर पोहचली असून ऊसाचा ग्रीन बेल्ट असलेल्या परभणी जिल्ह्यातील सोनपेठ तालुक्यातील असंख्य गावातील शेतकरी यांनी समितीला पाठींबा देत शेतकऱ्यांनी आपली ऊस तोड व ऊस वाहतूक थांबवली आहे. यातच ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने समितीत सामील होऊल पेक्षा अधिक वाहनाद्वारे जिल्ह्यातील सर्वच साखर कारखानदारांना भेटी देत आपल्या मागण्याचे निवेदन दिले.

ऊस उत्पादक शेतकरी, साखर कारखानदार यांच्याशी जिल्हाधिकाऱ्यांच्या मध्यस्थीने झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत कारखानदारांनी कोणतीही सकारात्मक भूमिका न घेतल्यामुळे ही चर्चा निष्फळ ठरली. ऊस दराबाबत कोणताही निष्कर्ष निघाला नसल्याने ऊस आंदोलन चिघळले आहे. जिल्ह्यातील ऊस तोड, ऊस वाहतूक ठप्प झाली असून काही साखर कारखाने बंद तर उर्वरित येत्या काही दिवसांत ऊसाची आवक नसल्याने बंद होण्याच्या मार्गावर आहेत. अशातच शुक्रवारी (दि-२८) शेकडो ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी वाहनांच्या ताफ्याद्वारे जिल्ह्यातील ओंकार शुगर्स पांगरी, अंबा साखर अंबाजोगाई, येडेश्वरी शुगर्स केज, गंगा माऊली शुगर्स केज या ठिकाणी शेतकरी समितीने भेटी देऊन सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात केंद्र सरकारने ऊसासाठी प्रत्येक टनासाठी ३५५५ रूपयांचा दर,१०.२५ रिकव्हरीला जाहीर केला आहे.

आपणाकडे ११ किंवा त्यापेक्षा जास्त सरासरी रिकव्हरी लागत आहे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च लक्षात घेता प्रती टन ३ हजार रूपये पहिली उचल तर ४ हजार रूपये अंतिम दर मिळाला पाहीजे, या मागणीचे निवेदन संबधितांना दिले आहे. याबाबत जिल्हाधिकारी, बीड व साखर सहसंचालक छ. संभाजीनगर विभाग यांना देखील कळवण्यात आले आहे.

ऊस उत्पादक संयुक्त कृती समितीने सुरू केलेल्या या आंदोलनास विविध ऊस तोड कामगार संघटना, विविध गावातील ग्राम पंचायत, सेवा सहकारी सोसायटी यांनी ठराव मंजूर करत पाठिंबा दिला असून ऊस प्रश्न पेटलेले हे आंदोलनाबाबत साखर कारखानदारांनी सकारात्मक प्रतिसाद न दिल्यास हे आंदोलन यापेक्षा अधिक तीव्र स्वरूप घेऊन जन आंदोलन होईल असे कृती समितीकडून सांगण्यात येत आहे.

# नांदगावच्या दत्तनगरीत श्री दत्त जयंती उत्सवास थाटात प्रारंभ

## गुरूवर्य प. प. गुलाबगिरी महाराजांच्या उपस्थितीत होणार उत्सव

**लातूर/प्रतिनिधी**



लातूर शहरापासूनच जवळच असलेल्या नांदगाव इथिओल दत्तनगरीतील श्री दत्त मंदिर देवस्थानमध्ये रौप्य महोत्सवी दत्त जयंती उत्सवास थाटात प्रारंभ झाला. दत्तनगरीचे संस्थापक गुरुवर्य प.पू. गुलाबगिरी महाराज यांच्या दिव्य सानिध्यात हा उत्सव साजरा करण्यात येत आहे.

,नांदगावच्या माळरानावर गुरुवर्य प.पू. गुलाबगिरी महाराजांनी श्रीदत्त मंदिर देवस्थानची उभारणी करून या जागेचे मनमोहक अशा नंदनवनात रुपांतर केले आहे. मागच्या २५ वर्षांपासून या ठिकाणी श्रीदत्त जयंतीचा उत्सव विविध धार्मिक कार्यक्रम, भजन, कीर्तनाने हर्षोल्हासात साजरा केला जातो. या उत्सवाचे हे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही श्री गुरुचरित्र पारायण, श्रीमद याग व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यास सुरुवात झाली आहे. सप्ताहाचे औचित्य साधून बुधवारी श्रीदत्त महाराजांच्या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत भक्तिमय वातावरणात गुलाबगिरी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली हा पालखी सोहळा पार पडला. गुरुवारी सायंकाळी हभप. गोपाळदेव जोशी महाराज ढाळे गावकर यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. आपल्या ओघवत्या वाणीतील कीर्तनाने महाराजांनी उपस्थित भाविक भक्तांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. यानिमित्त श्री दत्त भजनी मंडळ. नांदगाव, संतकृपा भजनी मंडळ, राघवेंद्र महिला भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम झाला. शुक्रवारी जनाबाई महिला भजनी मंडळाच्या भजनी मंडळाने उत्तम भजने तसेच गवळणी प्रस्तुत करून भाविक भक्तांची मने जिंकली शाम मोरे यांच्या गवळणीने उपस्थित भाविक आपले देहभान हरवून गेल्याची अनुभूती आली.

या वर्षीच्या उत्सवाविषयी बोलताना गुलाबगिरी महाराज म्हणाले की, प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही श्रीदत्त महाराजांच्या कृपाशीर्वादाने अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षीचा सोहळा रौप्य महोत्सवी असल्याने प्रतिवर्षाच्या तुलनेत भाविक भक्तांची उपस्थितीही लक्षणीय असणार आहे. त्यादृष्टीने देवस्थानच्या वतीने सर्वतोपरी नियोजन करण्यात आले आहे. सप्ताहादरम्यान भाविकांसाठी दररोज महाप्रसादाचीही सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सोहळ्यास विविध समाजाच्या स्तरातील मान्यवरांचे सहकार्य लाभले असून या सोहळ्याचा लातूर व परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही गुलाबगिरी महाराजांनी केले आहे.

# जागतिक एड्स दिनानिमित्त १ डिसेंबर रोजी सायकल रॅली

## १ ते १५ डिसेंबर या कालावधीत उपक्रमांचे आयोजन

लातूर/प्रतिनिधी

महाराष्ट्र एड्स नियंत्रण संस्था व जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या सूचनेनुसार जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय यांच्यावतीने १ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ६.३० वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. जागतिक एड्स दिनानिमित्त एचआयव्ही, एड्स जनजागृतीसाठी होत असलेल्या या उपक्रमाचे घोषवाक्य 'अडथळ्यांवर मात करून, एकजूटीने एचआयव्ही, एड्सला लढा देवू, नवं परिवर्तन घडवू' असे आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून सायकल रॅलीला सुरुवात होईल. या रॅलीत लातूरमधील सायकल क्लब, विद्यार्थी, स्थानिक सामाजिक संस्था, मान्यवर व्यक्ती, शासकीय अधिकारी व कर्मचारी सहभागी होणार आहेत. तसेच रॅलीच्या समारोपाप्रसंगी रेड रिबन क्लब विद्यार्थीमार्फत जगजागृतीपर फ्लॅश मॉब कार्यक्रम घेण्यात येणार आहे. या सायकल रॅलीत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

१ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजता एचआयव्ही जीवन जगणाऱ्या ११ ते १८ वर्षे वयोगटातील मुला-मुलींसाठी चित्रकला स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे.

त्याचबरोबर १ ते १५ डिसेंबर, २०२५ या कालावधीत जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये व्याख्याने, पोस्टर प्रदर्शन, विविध स्पर्धा, जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. अतिजोखीम गटातील व्यक्तींसाठी आरोग्य मेळावा व संवेदीकरण कार्यक्रम घेण्यात येणार आहे, असे जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथकाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांनी कळविले आहे.



# जागृती शुगरकडून ऊस तोड कामगारांची तपासणी

## लसीकरण शिबिराचेही आयोजन

**लातूर/प्रतिनिधी**

राज्यातील खासगी साखर कारखानदारीत नावलौकिक असलेल्या देवणी तालुक्यातील जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज व राज्य आरोग्य विभाग यांच्यावतीने ऊस तोड कामगार मजूर यांच्याकरिता आरोग्य तपासणी व लसीकरण सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन कारखाना स्थळी करण्यात आले होते. या मोफत शिबिराला उस तोड कामगार मजूर महिला व पुरुष यांनी मोठा सहभाग नोंदवला. यावेळी ऊसतोड मजूरांना मोफत औषधी देण्यात आली. तर जागृती शुगर कडून महिला ऊस तोड मजुरांना सॅनिटरी नॅपकिन मोफत वाटप करण्यात आली.याप्रसंगी आरोग्य विभागाचे देवणी तालुका येथील आरोग्य अधिकारी डॉक्टर रामचंद्र मोहिते, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर दिपाली शिंदे, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर स्वप्नील एकघरे, कारखान्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शाम हिबाने, कारखान्याचे जनरल मॅनेजर गणेश येवले, कारखान्याचे मुख्य शेतकी अधिकारी रामानंद कदम, मुख्यअभियंता अतुल दरेकर, मुख्य रसायनतज्ञ ज्ञानेश्वर जाधव, आसवनी इन्चार्ज विलास पाटील, ऊस पुरवठा अधिकारी लक्ष्मण बिराजदार, रामदास सोळुंके, राजकुमार कांबळे, महेश भंडे, ऊसतोड मजूर मुकादम चालक कृषी विभाग अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे २ डिसेंबर रोजी आयोजन

## १ डिसेंबरपर्यंत संबधित कार्यालयात नाव नोंदणी करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी**

युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी प्रतिवर्षी केंद्र शासनाच्यावतीने १२ ते १६ जानेवारी या कालावधीत राष्ट्रीय युवा महोत्सव आयोजित करण्यात येतो. राष्ट्रीय युवा महोत्वामध्ये राज्याचा प्रातिनिधीक संघ सहभागी करण्यासाठी राज्य शासनाने प्रतिवर्षी जिल्हास्तर, विभागस्तर व राज्यस्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन २ डिसेंबर रोजी लातूर येथे करण्यात येणार आहे. या स्पर्धेमधून प्रथम क्रमांकाच्या स्पर्धकाची विभागीय युवा महोत्सवासाठी निवड करण्यात येणार आहे.

यासाठी स्पर्धकांचे प्रवेश अर्ज १ डिसेंबर, २०२५ रोजी पर्यंत क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे (मो. ९९७५५६६००) यांच्याकडे सादर करावेत. जिल्ह्यामधील सर्व शाळा, महाविद्यालय, युवक मंडळे यातील इच्छूक कलावंताना, स्पर्धकांना यामध्ये सहभागी होता येईल. समूह लोकनृत्य, समूह लोकगीत, कथालेखन, चित्रकला, वक्तृत्व (भारतातील आणीबाणीचा काळ आणि संविधानोचे उल्लंघन आणि लोकशाही व लोकशाही मूल्यांचे संरक्षण), कविता लेखन, नवोपक्रम (विज्ञान प्रदर्शन) या जिल्हास्तरावर युवा महोत्सव स्पर्धा २ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी १० वाजता लातूर जिल्हा क्रिडा संकुल येथे आयोजित करण्यात आल्या आहेत. जिल्हास्तरीय युवा महोत्वामध्ये सहभागी होण्यासाठी इच्छूक स्पर्धकांनी १ डिसेंबर पर्यंत आपले अर्ज लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.

# भगवानआप्पा हालगे यांचे निधन

**परळी/प्रतिनिधी**



परळी शहरातील गणेशपार भागातील ज्येष्ठ नागरिक, रेशन दुकानदार असलेले भगवानअप्पा संबाप्पा हालगे (वय-७५) यांचे गुरुवारी (दि.२७) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# ३० नोव्हेंबर रोजी विशेष कर वसुली शिबिराचे आयोजन

## सेल्फी विथ रिसीप्टचे मनपाकडून आयोजन; शास्तीत ८० टक्के सुट

**लातूर/प्रतिनिधी**

कर संकलन व कर आकारणी विभाग मार्फत १ डिसेंबर पासून धडक जप्ती/अटकावणी मोहीम सुरू करण्यात येणार आहे. पण तत्पूर्वी थकबाकीदार यांना टॅक्स भरण्याची संधी मिळावी या दृष्टीने आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त (कर संकलन) डॉ. पंजाब खानसोळे यांच्या नियोजनातून ३० नोव्हेंबर रोजी सेल्फी विथ रिसीप्ट- विशेष कर वसुली शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात थकीत टॅक्स भरणारे मालमत्ता धारकांसाठी मालमत्ता करात ८० टक्के शास्ती माफी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

३० नोव्हेंबर २०२५ रविवारी सकाळी १० ते ५ या वेळात महानगरपालिका मुख्यालय येथे शिबिरात सहभागी होवून थकबाकीदार मालमत्ता धारकानी सूटचा लाभ घेवून आपला थकीत टॅक्स भरून शहराच्या विकासात हातभार लावावा असे आवाहन उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांनी केले आहे. या शिबिरापूर्वी ४ हजार थकबाकीदार मालमत्ता धारकांना नोटीस बजावण्यात आली असून या शिबिरासाठी देण्यात येणारी ८० टक्के शास्ती माफी ही या वर्षातील शेवटची शास्ती माफी योजना आहे. १ डिसेंबरपासून सुरू होणारी जप्ती सारखी कटू कार्यवाही टाळण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे. असे आवाहन मनपा उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांनी केले आहे.

## श्रीमती डॉ. कमलताई गवई यांचे मत

# यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा वारसा जपण्याची काळजी गरज

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याचा वारसा जपण्याचे गरज आहे. ते काम यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह करत असून ही अतिशय आनंदाची बाब आहे असे मत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या डॉ. कमलताई गवई यांनी व्यक्त केले आहे.

येथील वेणुताई चव्हाण महाविद्यालयाच्या प्रांगणात यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाच्या समारोपीय भाषणात डॉ. कमलताई रामकृष्ण गवई बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर श्रीमती विजया गंगाधर घुले-आष्टी, केशव वसेकर-परभणी, पं. मुकेश जाधव-औसा-पुणे व कु. प्रियंका हनुमंत इंगळे यांच्या आई वडिलांसह यशवंतराव चव्हाण स्मृती समितीचे सचिव दगडू लोमटे यांची उपस्थिती होती.

प्रारंभी कार्यक्रमाचे प्रस्ताविक यशवंतराव चव्हाण स्मृती समितीचे सचीव दगडू लोमटे यांनी केले. आपल्या प्रास्ताविक त्यांनी या समारोहाची सुरवात ४० वर्षापुर्वी या समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष स्व. श्री. भगवानरावजी लोमटे उर्फ बापू, भगवानराव शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी महाराष्ट्राचे शिल्पकार तथा पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरराव चव्हाण यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी केली असल्याचे सांगितले. सुसंस्कृत महाराष्ट्राच्या निर्मिती साठी यशवंतराव चव्हाण यांना अभिप्रेत असणाऱ्या साहित्य, कला-संगीत, कृषी आणि युवा शक्ती यांची सांगड घालत यासर्व




बाबींची माहिती या तीन दिवसीय यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहात देण्यात येते.

आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच डॉ. कमलताई गवई यांनी जगातील महापुरुषांना अभिवादन करुन यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतींना वंदन केले. आपल्या भाषणात त्या म्हणाल्या की, यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या माध्यमातून यशवंतराव चव्हाण स्मृती समिती मागील ४० वर्षांपासून जे विविध उपक्रम राबविण्यात येतात, ते सर्व मला जवळून पहाता आले, याबद्दल समितीचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून ज्या चार कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान माझ्या हस्ते करण्यात आला, याबद्दल समितीचे विशेष आभार त्यांनी मानले. विविध क्षेत्रातील चार व्यक्तींची माहिती गोळा करून त्यांचा सन्मान करणे हे मोठे काम असल्याचे त्यांनी सांगितले.

### यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार २०२५

**या कार्यक्रमात** डॉ. कमलताई रामकृष्ण गवई यांच्या हस्ते श्रीमती विजया गंगाधर घुले-केळ सांगवी ता.आष्टी यांना आदर्श शेतीसाठी, केशव वसेकर-प्रभावी यांना साहित्य, पं. मुकेश जाधव औसा- पुणे यांना संगीत तर कुत. प्रियांका हनुमंत इंगळे, कळंब अंबा ता. केज हिला युवा क्रीडा गौरव असे यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, आणि रोख पाच हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

आपल्या भाषणात त्यांनी रा. सु. गवई यांच्या सहवासातील अनेक आठवणींना उजाळा त्यांनी यावेळी दिला.

रा. सु. गवई आणि यशवंतराव चव्हाण यांचे अत्यंत घरगुती संबंध होते. गवई साहेबांचे विचार आणि यशवंतराव चव्हाण यांच्या विचारात बरेच साम्य आहे. यशवंतराव चव्हाण यांचा आदर्श घेवूनच त्यांनी आपल्या सामाजिक आणि राजकीय जीवनात काम केले. ग्रामीण विभागातील मुलांना शिक्षीत करण्यासाठी त्यांनी ग्रामीण भागात अनेक शिक्षण संस्था काढल्या. अशा यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याचा वारसा जपण्याचे काम यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह करतो आहे ही अतिशय आनंदाची बाब आहे असे मत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या डॉ. कमलताई गवई यांनी व्यक्त केले.या तीन दिवसीय समारोहात चित्रकला प्रदर्शन, कृषी प्रदर्शन, ग्रंथ विक्री व कृषी विषयक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. कै. भगवानरावजी लोमटे यांच्या प्रेरणेने सुरु झालेल्या या समारोहाचे महाराष्ट्रभर कौतुक होत आलेले आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचलेल्या या समारोहास रसिक श्रोत्यांनी तिन्ही दिवस उपस्थित उत्तम प्रतिसाद दिल्याबद्दल समितीच्यावतीने आभार मानले.

रा. सु. गवई यांच्याशी विवाहानंतर संसाराची जबाबदारी सांभाळतांना अनेक कसरती कराव्या लागल्या. मी मुळात शिक्षिका असल्यामुळे मुलांवर संस्कार करणे महत्त्वाचे आहे. आपल्या मुलांची ओळख चांगला माणूस म्हणून व्हावी अशी इच्छा होती आणि ती इच्छा माझ्या न्या. भूषण गवई व राजेंद्र या मुलांनी पुर्ण केली याचा मला अभिमान असल्याचे डॉ. कमलबाई गवई म्हणाल्या.

# कारच्या धडकेत दुचाकीवरील दोन ठार ; एक गंभीर

## हट्टा येथील दुर्दैवी घटना, गावावर शोककळा

**हट्टा / प्रतिनिधी**

हट्टा ते आडगाव मार्गावरील दर्शना बार जवळ २८ नोव्हेंबरच्या रात्री साडेआठ वाजेच्या दरम्यान बोरी सावंतकडे जाणाऱ्या दुचाकीला पाठीमागून येणाऱ्या कारने उडविल्याने दुचाकीवरील दोघेजण ठार तर एक जण गंभीर झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, बोरी सावंत येथील मित्राला आपल्या दुचाकीवर सोडण्यासाठी जात असताना झिरो फाट्याकडून हिंगोलीकडे जाणारी स्विफ्ट डिझायर कार एमएच ६ बी.व्ही. १९७३ ने पाठीमागून उडविले. ज्यामध्ये दुचाकीवरील अरुण सुनील सुर्वे रा. हट्टा, ओंकार गणपत बारहाते रा. हट्टा या दोघांचा मृत्यू झाला तर किशोर धोंडीबा सावंत रा. बोरी सावंत हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली आहे. दुचाकीवरील तिघेही परभणी येथील महाविद्यालयात डी-फार्मसी शिक्षण घेत होते. या अपघातातील दोन्ही मयतावर हट्टा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. एका मित्राला मुखाग्नी देताना दुसऱ्या मित्राचा मृतदहे येताना पाहून अनेकांचे डोळे पाणवले होते. हट्टा गावातील दोन तरुणांचा असा करूण अंत झाल्याने हट्टा गावावर शोककळा पसरली आहे.





# शेतीचा वाद : पोलीस ठाण्यातच केला शेतकऱ्याने आत्महत्येचा प्रयत्न

## सहा जणांविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**कळमनुरी / प्रतिनिधी**

कळमनुरी तालुक्यातील मसोड येथील एका शेतकऱ्याने शेतीच्या वादातून कळमनुरी पोलीस ठाण्यातच विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना २७ नोव्हेंबर रोजी रात्री घडली असता एकच खळबळ उडाली होती. या प्रकरणी कळमनुरी पोलीस ठाण्यात शेतकऱ्याने दिलेल्या फिर्यादीवरून सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ नोव्हेंबर रोजी रात्री आठ वाजेच्या सुमारास मसोड येथील माधव भालेराव या शेतकऱ्याने शेतीच्या वादातून कळमनुरी पोलीस ठाण्यात विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असता तेथील उपस्थित जमादार रवी इंगोले, सोपान सांगळे, लक्ष्मीकांत मिटकर, कानबाराव हराळ, जगन पवार, शेळके यांनी माधव भालेराव या शेतकऱ्यास तात्काळ कळमनुरी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. तेथे प्राथमिक औषधोपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी नांदेड येथे माधव भालेराव यांना पाठविण्यात आले असून माधव भालेराव यांच्यावर उपचार सुरू आहेत व सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. दरम्यान, माधव भालेराव यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीत नमूद केली आहे की, त्यांच्या शेतात अनधिकृत रित्या प्रवेश करून शेतामधील कापूस वेचून चोरी करून शेतमालाचे नुकसान करून त्यांना धमक्या देण्यात आल्या. या आशयाची फिर्याद कळमनुरी पोलीस ठाण्यात नोंदविल्यानंतर प्रज्योत सातव, गजानन चरखा, अशोक सातव, प्रज्योत काळे, विष्णू सातव यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत भिंगारे करीत आहेत.

# शिवनेरी मित्र मंडळाकडून अजय चौधरी यांचा सत्कार

**बोरी / प्रतिनिधी**



रामेश्वर-सोमेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धार करण्यासाठी तब्बल १ कोटी ८६ लाख निधी मंजूर करून आणल्याबद्दल माजी जि.प. उपाध्यक्ष अजय चौधरी यांनी नुकताच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बोरीकरांना सुखद धक्का देत मंदिरासाठी निधी मंजूर करून दिला.

याकामी तसेच माजी आमदार विजयराव भांबळे यांनी सतत शासन दरबारी पाठपुरावा करून मान्यता मिळवली. याबद्दल व रामेश्वर सोमेश्वर संस्थानचे अध्यक्ष अशोकराव चौधरी यांचा सत्कार करण्यात आला.

मागील २९ वर्षापासून शिवनेरी मित्र मंडळ याठिकाणी नवरात्र महोत्सव आयोजित करते. यांच्यावतीने तसेच उपस्थित सर्व गावकऱ्यांच्या आणि भाविकांच्या वतीने हा सन्मान झाला. याप्रसंगी संस्थानाचे अध्यक्ष अशोकराव चौधरी जेष्ठ व्यापारी राधेगोविंदजी नवल व सेवानिवृत्त शिक्षक सदाशिवराव गुरुजी मनोज दाणे यांची प्रमुख उपस्थिती होती. रामेश्वर सोमेश्वर हेमाडपंथी महादेव मंदिर विकासासाठी जि.प. उपाध्यक्ष अजय चौधरी यांच्या प्रयत्नातून एक कोटीचा ८६ लाख रुपये निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचा शिवनेरी मित्र मंडळ व गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी शिवनेरी मित्र मंडळ सतीश जोशी, कैलास नवाळ, नागेश चौधरी,आबा देशमुख, गजानन चौधरी, चंद्रशेखर चौधरी, किशोर चांदिवाले, नाना स्वामी, ओंकार कराळे, संतोष लहाने, विकास देशमुख, सुनील चैन, बाळासाहेब सावळे, भूषण चौधरी, अभय वाघमारे, मजगे गुरु, शंकर सुकळे, परमेश्वर जाधव, टेलर, रंगनाथ चौरे, रामेश्वर ईक्कर कार्यक्रमाचे प्रस्तावना शशिकांत चौधरी व आभार प्रदर्शन विजय राठोड यांनी केले.

# हिंगोलीत पतंजलीचे वृक्षमित्र, हरित शाळा पुरस्कार प्रदान !

**हिंगोली / प्रतिनिधी**

पतंजली योग पिठाचे आधुनिक धनवंतरी आचार्य बालकृष्ण यांच्या जन्मदिनानिमित्त हिंगोली जिल्हा पतंजली योग समिती मार्फत वृक्ष मित्र व हरित शाळा पुरस्काराची घोषणा करण्यात आली होती. त्यामध्ये पाच संस्थांसह वीस वृक्षमित्र तर दहा शाळा हरित शाळांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. या पुरस्कारांचे वितरण २८ नोव्हेंबर रोजी संत निरंकारी भवन हिंगोली या ठिकाणी आयोजित केला होता. अशी माहिती पतंजली योग समिती भारत स्वाभिमान ट्रस्टचे जिल्हा प्रभारी विठ्ठल सोळंके यांनी दिली.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पतंजली योग समितीचे प्रांताध्यक्ष दिनेश राठोड, तर मुख्य अतिथी म्हणून प्रांत सदस्य कुंडलिकराव निर्मले, माजी जिल्हा न्यायाधीश ॲड. पद्माकर पुरी, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे, खाजगी अनुदानित पतसंस्थेचे अध्यक्ष प्राचार्य विठ्ठल मुटकुळे आदींची उपस्थिती होती. या पुरस्कारांमध्ये सह्याद्री देवराई कुरुंदा, डॉक्टर्स असोसिएशन कळमनुरी,कृषी विज्ञान केंद्र तोंडापूर वारंगा, स्व. लक्ष्मणराव पाटील सेवाभावी संस्था,ताकतोडा, वसुमती फार्मर्स प्रोड्युसर कंपनी वसमत या पाच संस्थांना वृक्षमित्र पुरस्कार जाहीर झाला असून त्यासह हरित चळवळीत कार्य करणारे कन्हैयालाल नेणवानी, नंदकुमार तोष्णीवाल, अभय भरतीया, मधुकर चेटप,

विनोद खरात, डॉ. प्रेमेन बोथरा, महेश खुळखुळे, प्रा. आशिष इंगळे, प्रा.डॉ. रामभाऊभाकरे, दादाराव शिंदे,तानाजी भोसले, संगीता चौधरी, मोहन पाटील, दत्ता तुरनर व युवा वृक्षमित्र रवी चौधरी यांच्यासह वृक्षमित्र पुरस्कारासाठी बापूराव देशमुख विद्यालय डोंगरकडा, विद्यासागर विद्यालय, खानापूर (चित्ता),महावीर मराठी हायस्कुल पिंपळदरी,श्री बालाजी विद्यालय वाई, केंब्रिज स्कुल ऑफ स्कॉलर्स कळमनुरी, कै. दीनानाथ मंगेशकर माध्यमिक विद्यालय सातेफळ, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा दिग्रस कराळे, प्राथमिक शाळा निशाणा व नंदगाव, उच्च प्राथमिक शाळा वसई या शाळांना हरित शाळा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजकुमार टिळे तर आभार प्रदर्शन रमेश काळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी किसान सेवा प्रभारी ज्ञानदेव गुट्टे, पतंजली महामंत्री शितल तापडिया, पतंजली व भारत स्वाभिमान सहप्रभारी अशोक पवार, बाळासाहेब हरण, कोषाध्यक्ष उमेश तोष्णीवाल, जगन सरकटे, बाबाराव पवार, सतीश तायडे, रामकिसन मोरे, गजानन सावके, संजय नाईक, तानाजी दासूद, कडूजी हजारे, मंगल काळे, रजनी कदम आदींनी परिश्रम घेतले.

# नवीन शिक्षण धोरणामध्ये आरटीईचा उल्लेखच नाही

## डॉ. दिलीप चव्हाण यांची माहिती, संविधान दिनानिमित्त व्याख्यान

**वसमत / प्रतिनिधी**



बहिर्जी स्मारक महाविद्यालय वसमत अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने प्रज्ञा परिसंवाद अंतर्गत संविधान दिनाच्या निमित्ताने व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी अभ्यासक डॉ. दिलीप चव्हाण भाषा व संस्कृती अभ्यास संकुल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांनी मांडणी केली. यावेळी ते म्हणाले की, जगभर विकासाच्या बाबतीत असमतोल तयार होत असतो. राष्ट्रीय शिक्षण धोरण आज अंमलबजावणीच्या पातळीवरती अनेक बाबी राबवत आहोत. यामध्ये शिक्षणाचा मूलभूत हक्क सांगणारी आरटीईचाच उल्लेखच नाही, शिक्षण हे सर्वसामान्यांच्या हिताच सर्वसामान्यांच्या जगण्याला समृद्ध करणार असायला हवे. परंतु, या धोरणात जर शिक्षणाच्या मूलभूत हक्काचाच उल्लेख नसेल तर ही चिंतेची बाब आहे. पुढे बोलताना डॉ. दिलीप चव्हाण म्हणाले की, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ला आपल्याकडे आले आणि शिक्षणाच्या एकूणच पर्यावरणामध्ये अमुलाग्र बदल झाला. खरंतर या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणाच्या क्षेत्रात अमुलाग्र बदल झाले. प्रत्येक बदलाच्या पाठीमागचा एक वेगळा चेहरा असतो तो आपण समजून घ्यायला हवा, अभ्यासायला हवा यावेळी त्यांनी समकालीन भारतातील उच्च शिक्षण या विषयावर मांडणी केली. त्यांनी उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह उच्च शिक्षणातील आजची परिस्थिती शिक्षणाचे खाजगीकरण खाजगी विद्यापीठाची वाढणारी संख्या आदींकडे लक्ष वेधले. भारतातील उच्च शिक्षणाची दोन भागात झालेली विभागणी यावरही सविस्तर भाष्य केले. उच्च शिक्षणाच्या संदर्भात केळकर समितीने यापूर्वी अभ्यास केला. केळकर आयोगाच्या माध्यमातून एक अभ्यासपूर्ण दस्तऐवज सरकारकडे सुपूर्द केला. परंतु, आपण हल्ली हे सगळे दस्ताऐवज वाचण्याच्या मानसिकतेत नाही. कुणी पाहत नाही. वाचत नाही समजून तर घेतच नाही. त्यामुळे आज चिंतेची परिस्थिती निर्माण झाली आहे. कोणतीही पॉलिसी ही राजकीय असते कोणतीही पॉलिसी वाचताना एक आपला दृष्टिकोन हवा आपल्याकडे अनेक वेळापत्रक विशिष्ट वर्गाची काळजी घेऊन तयार होत असतात. यावेळी अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक ॲड. रामचंद्र बागल यांची उपस्थिती होती. प्रमुख उपस्थितीत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मा.मा. जाधव, प्रा. अनिल नादरे, डॉ. शारदा कदम, प्रा. प्रदिप इंगोले, प्रबंधक डॉ. पांडूरंग बर्वे आदींची उपस्थिती होती. यावेळी भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन डॉ. प्रताप पाटील यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. मा.मा. जाधव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. उद्धव राऊत यांनी केले तर आभार डॉ. नर्सिंग पिंपरने यांनी मानले. यावेळी प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पूर्णा तालुक्यातील खुजडा येथे बालविवाह मुक्त शंभर दिवस अभियान उत्स्फूर्तपणे साजरा

**पूर्णा / प्रतिनिधी**

तालुक्यातील खुजडा येथे बालविवाहमुक्त समाजाच्या दिशेने टाकलेल्या निर्णायक पावलाचे औचित्य साधत खुजडा येथे बालविवाह मुक्त शंभर दिवस अभियान उत्साहात व उस्फ ुर्तपणे साजरे करण्यात आले. ग्रामपंचायत, अंगणवाडी विभाग, महिलाबालविकास तथा स्थानिक सामाजिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने हे अभियान गावात प्रभावी रितीने राबविण्यात आले.




या अभियानाच्या शतदिवशी कार्यक्रमाला इन्स्टिट्यूट ऑफ सोशल अवेअरनेस ॲंड रीफॉर्म इसार संस्थेच्या वतीने शंभर दिवशीय बालविवाह मुक्त भारत अभियान पूर्णा तालुक्यातील २५ गावांमध्ये राबवण्यात येत आहे त्याचा एक भाग म्हणून खुजडा येथे कॅण्डल रॉली चे आयोजन करण्यात आले होते बालविवाह शपथ देखील घेण्यात आली या रॅलीमध्ये अंगणवाडी सेविका गावातील नागरी मुले मुली महिला सहभागी होत्या या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा समन्वयक लक्ष्मण गायकवाड हिसार संस्था तसेच फिल्ड ऑफिसर रेखा कांबळे या उपस्थित होत्या गावातील सर्व नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी सहकार्य केलं गावकऱ्यांची मोठी उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात जागरूकता रॅलीने झाली. विद्यार्थ्यांनी बालविवाहाला नाही म्हणूया, शिक्षणाचा हक्क मुलींचा-लवकर विवाह दूर करा'' अशा घोषणांनी गावभर जनजागृती केली. महिला बचतगट, युवक मंडळ व शिक्षकांनीही रॅलीत सहभागी होत सामाजिक परिवर्तनाचा संदेश दिला. बैठकीत बालविवाहाचे दुष्परिणाम, कायदेशीर बाबी, मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. बालविवाह रोखणे ही केवळ कुटुंबाची नव्हे तर संपूर्ण समाजाची जबाबदारी असल्याचे वक्त्यांनी सांगितले. अनेक पालकांनीही आपल्या मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी बालविवाहमुक्त ग्राम हा संकल्प सर्व ग्रामस्थांनी एकमुखाने स्वीकारला. शंभर दिवसांपासून सुरू असलेले अभियान गावाच्या सामाजिक जागृतीसाठी महत्त्वपूर्ण ठरल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. संपूर्ण खुजडा गावाने एकजुटीने दिलेला हा संदेश परिसरात आदर्शवत मानला जात आहे.

# बोरी येथे ज्योतिबा महात्मा फुले यांना अभिवादन

**बोरी / प्रतिनिधी**



बोरी येथे महात्मा ज्योतिबा फुले यांची स्मृति दिवस २८ नोव्हेंबर रोजी साजरा करण्यात आला. सुरुवातीला महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रंगनाथ चौरे, प्रमुख पाहुणे म्हणून नाना स्वामी, गजानन शेळके, संदिप चौधरी आदी उपस्थित होते. रंगनाथ चौरे यांनी महात्मा फुले यांच्या जीवन कार्यावर काही विचार सांगितले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक सुरज कनकुटे यांनी केले. सूत्रसंचालन राजू तिडके, आभार किशोर चांदीवाले यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी यावेळी गजानन शेळके, राजु उन्हाळे, किशोर चांदीवाले, गजानन चौधरी, सुरज कनकुटे, राजू तिडके, गणेश ठाकूर, प्रज्वल जैस्वाल, सुरेशराव गोरे, मनोज डाके, संतोष लहाने, गजानन पावडे, तानाजी हराळे आदींनी परिश्रम घेतले.

# महानगरपालिकेच्या मतदार याद्यात घोळात घोळ

## एका वार्डातील नावे दुसऱ्या वार्डात : मतदारांसह इच्छुक उमेदवारही गांगरले

**परभणी / प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक विभागाने प्रसिध्द केलेल्या मतदार याद्यातील घोळात घोळामुळे मतदारांसह प्रमुख राजकीय पक्षांचे इच्छुक उमेदवार चांगलेच हादरले आहेत.

राज्यातील एकूण २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादी प्रसिध्द केली. त्या यादीतील आपल्या व कुटूंबियांच्या समाविष्ट नावांबाबत मतदारांनी खात्री करावी, असे आयोगाने नमूद केले. हरकती व सूचना दाखल करण्याकरीता सुधारित वेळापत्रकापर्यंत ३ डिसेंबरपर्यंत मुदतसुध्दा बहाल केली. आयोगाच्या या आवाहनाप्रमाणे जागरुक मतदारांनी मतदार याद्यातील स्वतःसह कुटूंबियांच्या समाविष्ट केलेल्या नावांबाबत खातरजमा तसेच प्रमुख राजकीय पक्षांच्या त्या-त्या प्रभागातील जागरुक इच्छुकांनीही समर्थकांच्या नावासह अन्य मतदारांच्या नावांची खातरजमा सुरु केली. तेव्हा काही प्रभागात मतदार यादीतील घोळात घोळ समोर येऊ लागले आहेत. प्रसिध्द केलेल्या या मतदार याद्यातून काही कुटूंबातील मतदारांची नावे रहिवाशी असणाऱ्या त्या-त्या प्रभागाऐवजी बाजूच्या प्रभागातील मतदार याद्यात समाविष्ट झाल्याच्या बाबी प्रामुख्याने समोर आल्या आहेत सुज्ञ मतदार व इच्छुकांनी त्या संबंधीची अनेक उदाहरणे समोर आल्याबरोबर या मतदार याद्यांचा अभ्यास केला. तेव्हा काही प्रभागात शेकडो कुटूंबियातील सदस्यांची नावे गायब झाल्याच्या बाबी समोर येऊ लागल्या आहेत. याबाबत विभागाने अद्याप खूलासा केला नाही. दरम्यान, या प्रभागाप्रमाणे अन्य प्रभागातूनसुध्दा मतदारांची नावे शेजारच्या अन्य प्रभागात समाविष्ट झाल्याच्या तोंडी तक्रारी मोठ्या प्रमाणावर पुढे येऊ लागल्या आहेत.

> **हरकती व सूचना दाखल करण्याचा सुधारित कार्यक्रम**
> महानगरपालिका निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने प्रसिध्द केलेल्या प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्या संदर्भात आता ३ डिसेंबरपर्यंत मुदत बहाल केली आहे. १० डिसेंबर रोजी दाखल केलेल्या या हरकतींवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतीम मतदारयाद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द केल्या जाणार आहेत. त्या याद्या मतदान केंद्राच्या ठिकाणी १५ ते २२ डिसेंबर दरम्यान झळकणार आहेत.

# छत्रपती संभाजीनगर-तीर्थपुरी मुक्कामी बस सुरू करण्याची प्रवाशांची मागणी

**तीर्थपुरी/प्रतिनिधी**



छत्रपती संभाजीनगरला सकाळी सात वाजता जाणारी आणि तीर्थपुरी मुक्कामी असणारी एसटी बस पुन्हा सुरू करण्यात यावी, अशी जोरदार मागणी स्थानिक प्रवाशांकडून होत आहे.

तीर्थपुरी येथून दररोज सकाळी ७ वाजता छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी एसटी बस अनेक वर्षे नियमितपणे धावत होती. ही बस तीर्थपुरीत मुक्कामी असल्याने प्रवाशांना मोठी सुविधा उपलब्ध होती. मात्र, गेल्या दोन ते तीन वर्षांपासून ही बस अचानक बंद करण्यात आली. या निर्णयाबाबत एसटी महामंडळाकडे वारंवार विनंती करूनही कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याची माहिती प्रवाशांनी दिली. तीर्थपुरी शहरासह परिसरातील गावांमधून रोज मोठ्या प्रमाणात प्रवासी शिक्षण, नोकरी व इतर कामांसाठी छत्रपती संभाजीनगरला जातात. अनेक विद्यार्थी संभाजीनगरमध्ये शिक्षण घेत असल्याने ही सकाळची बस त्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची होती. बस बंद झाल्यामुळे प्रवाशांना खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत असून अतिरिक्त खर्चाचा मोठा बोजा सहन करावा लागत आहे. एसटीची बस सुरू करण्यासाठी आता आमदार हिकमत उढाण यांनी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा प्रवासी वर्गाने व्यक्त केली आहे.

# हदगावमध्ये लक्ष्मण काळबांडेंच्या प्रचाराला गती

## ठाकरे गटाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या मार्गदर्शनात नियोजन

**हदगाव/प्रतिनिधी**





हदगाव नगर परिषदेच्या निवडणुकीला अवघे दोन दिवस शिल्लक राहिले असताना प्रचाराचा धुराळा चालू आहे. प्रचारामध्ये आघाडी घेतलेले खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे कट्टर समर्थक निष्ठावंत शिवसैनिक लक्ष्मण काळबांडे यांनी आपली उमेदवारी प्रभाग क्रमांक ९ अ अनुसूचित जाती सर्वसाधारण मध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून आपली उमेदवारी दाखल केली आहे. शिवसेनेच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सीमाताई बालाजी धाळाप्पा असून त्यांच्यासोबत प्रभाग क्रमांक ९ ब मध्ये मुस्लिम चेहरा हिना बेग मुनीम बेग सर्वसाधारण महिलांसोबत आहेत.

संकटात धावून जाण्याचा स्वभाव

प्रभागांमध्ये घरोघरी फिरून प्रत्येक मतदार बांधवांशी पोहोचले आहेत. लक्ष्मण काळबांडे हे स्थानिकचे उमेदवार असून त्यांनी अनेकवर्ष समाज कार्यामध्ये गेली आहे. त्यांना प्रभाग क्रमांक नऊमधील नागरिक संकटमोचक म्हणून संबोधल्या जातात. संकट समई धावून येणारा नेता म्हणून काळबांडे यांची ओळख आहे. खा.नागेश पाटील आष्टीकर व जनतेने त्यांच्या हाती मशाल दिली असल्यामुळे ही मशाल पेटल्याशिवाय राहणार नाही असे मत नागरिकांतून व्यक्त होत आहे.

लक्ष्मण काळबांडे यांनी तक्षशिला बुद्धविहार फुलेनगर येथे तथागत भगवान बुद्ध यांची मूर्ती भेट दिल्यामुळे दररोज त्या ठिकाणी वंदना होते. त्यांनी स्वतःच्या घरी अंगणवाडी ला जागा देऊन लहान चिमुकल्या मुलासाठी संस्कार केंद्र उभे केले. त्याचबरोबर अनेकांच्या सुख दुःखामध्ये रात्री बे रात्री धावून जाऊन जातात. वार्डातील पाण्याचा प्रश्न असो, लाईट रस्त्याचा नाल्याचा प्रश्न असो, लक्ष्मण काळबांडेनी खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या माध्यमातून सहज सोडविले आहेत. प्रभाग क्रमांक ९ मधील असंख्य वयोवृद्ध, अपंग. निराधार. यांना संजय गांधी निराधार योजनेमार्फत मोफत पगारी केल्यामुळे दरमहा दोन हजार रुपये निराधार लोक उचलीत आहे.

शहरातील निसर्ग रम्य ठिकाण असलेले भदंत टेकडी बौद्धाची श्रद्धास्थान या ठिकाणी सतत वीस वर्षापासून सेवा करून समाजांना एकजूट करण्याचे काम त्यांनी केले. त्यांच्या आजोबापासून भदंत टेकडी जागा सांभाळत असल्यामुळे आज ती जागा सुरक्षित आहे हे सर्व काळबांडे कुटुंबियाची पुण्याई आहे. भिमाई नगर बुद्ध विहार मध्ये तथागत बुद्ध यांची मूर्त देण्याचा त्यांचा मानस आहे.

# उमरगा शहराच्या विकासासाठी भरघोस निधी देऊ

## पालकमंत्री प्रताप सरनाईक यांचे आश्वासन

**उमरगा/प्रतिनिधी**



उमरगा नगर परिषद निवडणुकीने अंतिम टप्प्यात जोर धरला असून प्रचाराचा धुराळा उडाला आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भरघोस निधी देण्याची ग्वाही देत पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी विकासकामांची अखंड ज्योत तेवत ठेवण्याचे काम नगराध्यक्ष म्हणून किरण गायकवाड करतील. मतदारांनी त्यांना मताधिक्य देऊन विकासकामांची संधी द्यावी, असे आवाहन केले.

शिवसेना, काँग्रेस, आरपीआय व लहुजी शक्ती सेना शहर विकास आघाडीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार किरण गायकवाड व सदस्यांच्या प्रचारार्थ आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते.

यावेळी माजी खासदार प्रा. रवींद्र गायकवाड, शिवसेना उपनेते राजन साळवी, भगवान देवकते, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, ज्येष्ठ नेते जितेंद्र शिंदे, बाजीराव चव्हाण, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अश्लेष मोरे, सिद्रामप्पा चिंचोळे, मोहन पणुरे, बळिराम सुरवसे, मधुकर यादव, अर्जुन बिराजदार, विजय दळगडे यांच्यासह नगरसेवकपदाचे उमेदवार उपस्थित होते. शिवसेना ही कोणत्याही जातीच्या विरोधात नाही. शहरातील मुस्लीम समाजाच्या कब्रस्थानच्या जागेचा प्रश्न आचारसंहिता संपल्यानंतर मार्गी लावू, असे आश्वासन देऊन पालकमंत्री सरनाईक यांनी दिले.

यावेळी काँग्रेसचे नानाराव भोसले, सदस्यपदाच्या उमेदवार रेखाताई सूर्यवंशी, लघुजी शक्ती सेनेचे सुखदेव होळीकर, शाहूराज माने यांची भाषणे झाली. भारत मोरे यांनी सूत्रसंचालन केले. ॲड. एस. पी. इनामदार यांनी प्रास्ताविक केले. स्थानिक विकासासाठी स्थानिक नेत्यांना उचित वाटणारा निर्णय घेण्याची मुभा पक्षप्रमुख एकनाथ शिंदे व आपण स्वतः दिली होती. या युतीतून नागरिकांसाठी चांगले काही घडत असेल तर काँग्रेसशी हातमिळवणीत गैर काय असे पालकमंत्री प्रताप सरनाईक सांगितले.

# ट्रॅक्टरच्या धडकेत दुचाकीस्वार तरुण ठार



## एक जण गंभीर जखमी

**गंगापूर/प्रतिनिधी**

गंगापूर-वैजापूर मार्गावरील वरखेड पाटीजवळ शुक्रवारी (दि. २८) रात्री साडेआठच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाला. या घटनेत एक जण गंभीर जखमी झाला. राज विजय पाळंदे (वय २२, रा. वरखेड) असे मृत तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गंगापूरकडून वैजापूरकडे ऊस घेऊन जाणाऱ्या दोन ट्रॉली जोडलेल्या ट्रॅक्टरने समोरून येणाऱ्या दुचाकीला जबर धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की दुचाकीवरील राज पाळंदे व राजू उबाळे (वय २०, रा. वरखेड) हे दोघेही गंभीर जखमी झाले. अपघातानंतर रुग्णवाहिका चालक अनिकेत मुळक यांनी तातडीने जखमींना गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी राज पाळंदे यास मृत घोषित केले. राजू उबाळे याला प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे, मृत राज हा कुटुंबातील एकुलता एक मुलगा व एकमेव कमावता होता. त्याच्या अचानक झालेल्या मृत्यूमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# आम्हाला सर्वधर्मियांचा पाठींबा; कुमुद सोनूलेंचा दावा

## माजी खासदार हरिहरराव सोनुले यांच्या विचाराचा वारसा जपण्याचा संकल्प

**हदगाव/प्रतिनिधी**



हदगाव नगर परिषदेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार कुमुद सुनील सोनुले यांनी सर्वधर्मीयांशी संवाद साधत प्रचारात समतोल राखला आहे. कुमुद सोनुले हे लोकांच्या घराघरात पोहोचत असल्यामुळे त्यांनी कॉर्नर सभेवर भर न देता लोकांच्या मनामध्ये घर केले आहे. सायंकाळपर्यंत संपूर्ण हदगाव घराघरापर्यंत पिंजून काढत असल्यामुळे त्यांना सर्वच धर्मीयांचा पाठिंबा मिळत असल्याचा दावा केला आहे.


हदगाव नगरपरिषद अध्यक्षपदाचा आढावा घेता मुस्लिम समाजाचे मतदार बांधव पहिल्या क्रमांकावर असून नंबर दोन मध्ये अनुसूचित जाती व तीन मध्ये ओबीसी समाज असल्यामुळे व काँग्रेस पक्षांना चाहता वर्ग मोठ्या प्रमाणात असल्याने आपल्या विजयाचा मार्ग सुकर असल्याचे सोनुले यांनी सांगितले. सुनील सोनुले हे विरोधकावर टीका न करता त्यामध्ये वेळ न गमावता तेवढाच वेळ मतदार बांधवापर्यंत देत आहेत. नांदेड जिल्ह्याचे पहिले खासदार हरिहरराव सोनुले यांच्या विचाराचा वारसा सुनील भाऊ सोनुले जपत असल्यामुळे येणाऱ्या काळामध्ये फुले शाहू आंबेडकर विचाराची पेरणी करून सुसज्ज माणूस घडवण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कुमुद सुनील भाऊ सोनुले यांना असंख्य मुस्लिम, लिंगायत समाजाचा भरभरून प्रतिसाद असल्याने प्रचारांना कलाटणी वळण घेतल्याचे चित्र आहे. सुनील सोनुले यांना बौद्ध समाज कदापी विसरू शकत नसल्याची भावना आहे. दोन दिवसापासून त्यांच्या घरापुढे भरगच्च व त्यांच्या पाठीमागे असंख्य लोक जमा पाहून विरोधकांना धास्ती लागली आहे. त्यामुळे टीका टिपणी करून विरोधक सुनील भाऊ सोनुले यांना डॅमेज करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे सोनुले यांनी सांगितले. सुशिक्षित मतदार बांधव असल्यामुळे त्यांच्या टीकाटिपनीला कोणीही बळी पडणार नाही असे मतदार बांधव त्यांना समक्ष भेटून सांगत आहेत. विजय हा निश्चित असल्याने विरोधकांची धावपळ वाढली असल्याचे दिसून येत आहे. अवघ्या दोन दिवसांमध्ये सर्व चित्र समोर येणार असून विरोधकांची कोणती चालबाजी चालणार नसल्याचे बोलल्या जात आहे.

# काँग्रेस उमेदवार हासरा बेगम, पांडुरंग वर्षवार यांचा मतदारांच्या भेटीवर भर

**भोकर/ प्रतिनिधी**





भोकर नगर परिषदेतील निवडणूक प्रचार आता शिगेला पोहोचला असून दोन डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे उमेदवाराच्या प्रचाराला प्रचंड वेग आला असून प्रभाग सात ब चे काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवार हासरा बेगम अब्दुल समी यांनी प्रचारात मतदारांच्या भेटी, बैठका, कॉर्नर बैठका घेत संवाद साधला आहे. मतदारांशी असलेले संवाद आणि कामाच्या बळावर आपण विजयी होणार असल्याचा विश्वास हसरा बेगम अब्दुल समी यांनी केला आहे.

याच प्रभागातील प्रभाग क्रमांक सात अ चे काँग्रेस पक्षाचे उमेदवार पांडुरंग वर्षेवार यांनाही मोठ्या प्रमाणात मतदारांचा पाठिंबा मिळत आहे. पांडुरंग वर्षवार हे वर्षभर सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. ते प्रत्येक समाजातल्या गरजवंतांच्या सुख-दुःखात धावून जातात. त्यामुळे या प्रभागातून त्यांचा विजय निश्चित होईल असा ठाम विश्वास त्यांचे मोठे बंधू निळकंठ वर्षवार यांना आहे. भोकर शहरातील प्रसिद्ध व्यवसायिक असलेले अब्दुल समी यांच्या सामाजिक कार्याचा त्याचबरोबर त्यांचे सर्वधर्मियांसोबत असलेले सामाजिक सलोख्याचे संबंध आहेत.

हासरा बेगम अब्दुल समी यांनी महात्मा फुले नगर भीम टेकडी ,तांडा परिसर जेठिबा वर्षेवार, नगर व नंदिनगरातून मतदारांशी संवाद साधत आपले मुद्दे पोहचविले आहेत. त्यांना विजयापासून कोणीही रोखू शकणार नाही असा विश्वास पदाधिकारी व्यक्त करत आहेत. त्यामुळे या प्रभागातील काँग्रेस पक्षाचे दोन्ही उमेदवार प्रबळ असल्याने नगराध्यक्षपदाचे उमेदवार संदीप गोड यांनाही मतदानात मोठी आघाडी मिळणार आहे. त्यांना मानणाऱ्या तरुण वर्गाची संख्या या प्रभागामध्ये जास्त असल्याने नगरअध्यक्ष पदाच्या उमेदवारासही येथून लीड मिळेल असा दावा त्यांच्या प्रचारकांनी केला आहे.

# जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्याकडून खुलताबाद शहर नगरपरिषद निवडणूकीचा आढावा

**खुलताबाद/प्रतिनिधी**

खुलताबाद नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक मतदान प्रक्रिया तोंडावर आली असून प्रशासनाकडून निवडणूकची तयारी कशी करण्यात आली, या संदर्भात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आढावा बैठक घेऊन प्रत्यक्ष पाहणी करीत सूचना केल्या.

शहरात १० प्रभागात २० नगरसेवक व १ नगराध्यक्ष पदासाठी सार्वत्रीक निवडणूकीचे २ डिसेंबर मंगळवारी रोजी मतदान प्रक्रिया होणार आहे. यात १४७७५ मतदार हक्क बजावणार आहेत.त्यात ७४२४ महिला व ७३२४ पुरुष मतदार आहेत. १ नगराध्यक्ष पदासाठी १२ तर २० नगरसेवक साठी ७३ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत.

निवडणूकी पुर्वी तयारी म्हणून जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी खुलताबादेत गुरूवारी आढावा बैठक घेतली असून मतदान केंद्रावर प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. आचारसंहिताची अंमलबजावणी,सुरक्षा, निवडणूकीत पारदर्शकता, निर्भिडता, गोंधळ घालणाऱ्या विरुद्ध प्रतिबंधक कारवाई, कायदा सुव्यवस्था अबाधित व आचारसंहितेची अंमलबजावणी याकडे विशेष लक्ष देत प्रशासनाला सूचना केल्या. मतदार व उमेदवार यांना काही अक्षेप त्रास तक्रार असल्यास निर्भिडपणे आपण नगरपरिषद कक्षेत येवून प्रशासनाकडे मांडव्या अशी सूचना केली. निवडणूक प्रक्रिया शांततेत पारदर्शक, निर्भिडपणे कशी होईल, यासाठी प्रशासन बरोबरच उमेदवार मतदार नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी संतोष गोरड, निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार स्वरूप कंकाळ, नगरपरिषद प्रशासक तथा सहाय्यक निवडणूक अधिकारी समीर शेख,पोलिस उपविभागीय अधिकारी कन्नड श्रीमती अग्निहोत्री, पोलिस निरीक्षक धनंजय फराटे यांच्यासह निवडणूक तथा नगरपरिषद कर्मचारी, पोलिस कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

# भोकर : साधना शिंदे यांचा नियोजनबद्ध प्रचार !

## अखेरच्या टप्प्यात भाजप उमेदवारांची विकासकामांचा दाखल देत साद

**भोकर/प्रतिनिधी**

भोकरमध्ये जसजशी मतदानाची तारीख जवळ येत आहे तस तशी उमेदवार प्रचारात आघाडी घेत असल्याचे चित्र आहे. सर्वसाधारण जागेवर प्रभाग ८ ब मध्ये भाजपाच्या उमेदवार समाजसेविका साधना केशव शिंदे यांनी नियोजनबद्ध प्रचार करत मतदारांपर्यंत आपले मुद्दे पोहचविले आहेत. सामाजिक कार्यकर्ते भाजपाचे निष्ठावंत म्हणून सर्व जिल्ह्यात ओळख असलेले माधवराव शिंदे बटाळकर यांच्या त्या भावजय आहेत.

गत नगर परिषदेतील निवडणुकीत ते स्वतः या भागातील वार्डातून उभे होते तेव्हा त्यांचा अल्पशा मतांनी पराभव झाला होता. यंदा मात्र त्यांच्या भावजय साधना केशव शिंदे या महिला समाजसेविका भाजपकडून निवडणूक लढवीत असून त्यांनी प्रचारात मोठी आघाडी घेतल्याचे चित्र आहे.





**कामाच्या बळावर विजयाचा विश्वास**

त्यांना या प्रभागातील मतदार बंधू भगिनींचा अधिकाधिक पाठिंबा त्यांना मिळत असल्याचे भाजप पदाधिकारी सांगत आहेत. त्यांनी या प्रभागातील महिलांचे अनेक प्रश्न त्यांनी मार्गी लावले असून अनेकांना न्याय मिळवून दिला आहे. कामाच्या बळावरच आपल्याला प्रभागात उस्फूर्त असा मतदारांचा पाठिंबा मिळत असल्याचे साधना शिंदे यांनी सांगितले. आपण निश्चित विजयाचे लक्ष्य गाठून मोठ्या मताधिकाने विजयी होणार असल्याचा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे या प्रभागामधून नगराध्यक्ष पदाचे उमेदवार भगवान दंडवे यांनाही मोठे मताधिक्क्य मिळण्याचा अंदाज आहे.

याच प्रभागातून आठ अ मधून तरुण युवा नेतृत्व अविनाश वाघमारे यांनाही मतदारातून वाढता पाठिंबा मिळत असल्याने येथे विरोधकांची अडचण होत असल्याचे दिसते. साधारणपणे भाजप व काँग्रेसमध्ये सरळ लढत होत असून येथे अपक्ष ही लढत असून ते किती मते घेतात याकडे या प्रभागातील जनतेचे लक्ष लागले आहे.